अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि.५ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १३० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## मोदी सांगतील तिथे मी जाण्यास तयार : अमरिंदर सिंग

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्रातील वादात सापडलेले राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी पंतप्रधान मोदींनाच पत्र लिहून राज्यपालपद सोडण्याची इच्छा व्यक्त केल्याने आता महाराष्ट्रातील राज्यपाल बदलले जाणार अशी अटकळ होती. परंतू, त्यालाही बरेच दिवस झाले आहेत.

केंद्रातून काही हालचाली दिसत नाहीएत. अशातच राज्याचे नवे राज्यपाल कोण असतील यावरून नावांची चर्चा सुरु झाली आहे. पंजाबचे माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे. अमरिंदर सिंग हे महाराष्ट्राचे नवे राज्यपाल असतील असे बोलले जात आहे. असे असताना अमरिंदर सिंग यांनी सूचक प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल बनण्याच्या सर्व शक्यतांवर सिंग यांनी त्या अफवा आहेत असे सांगितले. मला याबाबत काहीही माहिती नाही. याबाबत माझ्याशी कोणीही बोलले नाही. हे पूर्णपणे काल्पनिक आहे. मी मोदींना जेव्हा भेटलेलो तेव्हा त्यांना मी तुमच्यासोबत असल्याचे म्हणालो होतो. ते जिथे सांगतील तिथे मी जाण्यास तयार आहे, असे सिंग यांनी म्हटले आहे.



# ना काँग्रेस ना भाजप, आता अपक्ष

## नूतन आ.सत्यजित तांबेंनी केले प्रदेश काँग्रेसवर आरोप

सुराज्य/नाशिक

**‘मी काँग्रेस सोडलेली नाही. परंतु आता मी अपक्ष म्हणून निवडून आलो आहे. मला अनेक संघटनांनी आणि पक्षांनी पाठिंबा दिला होता. त्यामुळे मी आता अपक्षच राहणार आहे,’ असे सांगत नाशिक पदवीधर मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून गेलेले नूतन आ.सत्यजित तांबे यांनी ‘ना काँग्रेस ना भाजप, मी आपला अपक्ष’ अशी राजकीय भूमिका शनिवारी पत्रकार परिषदेत जाहीर केली.**

यावेळी बोलताना ‘एबी फॉर्म प्रदेश काँग्रेसने चुकीचे दिले. आम्हाला पक्षातून बाहेर घालवण्यासाठी प्रयत्न केले. आमच्या माध्यमातून ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना अडचणीत आण्याचा प्रयत्न केला’, असे उघड आरोप तांबे यांनी यावेळी केले.

यावेळी तांबे यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर आरोप केलेच. शिवाय काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी एच.के.पाटील यांनाही या वादात ओढले. काहीही चुक नसताना दिल्ली काँग्रेसने माफी मागण्यास भाग पाडले, असा आरोपही तांबे यांनी यावेळी केला.



### चुकीचे एबी फॉर्म दिले

एबी फॉर्म नागपूरमधून घेण्यास सांगितले होते. माझा माणूस १० जानेवारीला सकाळपासून संध्याकाळी सातपर्यंत बसून राहिला. त्यानंतर बंद लिफाफ्यात दोन एबी फॉर्म घेऊन आमचा माणूस आला. एबी फॉर्म बघितल्यावर कळाले की, हे फॉर्म आमचे नव्हते. त्यामध्ये एक औरंगाबादचा आणि एक नागपूरचा एबी फॉर्म होता, असे धक्कादायक सत्य सत्यजित तांबे यांनी पत्रकार परिषदेत उघड केले.


### दोघांपैकी कोणीही लढावे असा प्रभारींचा निर्णय

संघटना आणि पक्ष मला संधी देऊ शकत नाही. त्यामुळे वडिलांनी सांगितले की, ही निवडणूक तू लढवली पाहिजे. घरामध्ये चर्चा केली. त्या चर्चेमध्ये बाळासाहेब थोरात होते. त्यावेळी ठरले की सत्यजित यांनी लढावे. मात्र, त्यावेळी माझी मानसिक तयारी नव्हती. त्या प्रमाणे आम्ही पक्षाच्या नेत्यांना सगळे सांगितले होते की, आम्ही वेळेवर निर्णय घेऊ, त्या प्रमाणे एच. के. पाटील यांनी सांगितले की, दोघांपैकी कोणाला लढायचे यांचा निर्णय घ्या, पक्षाकडून कोरे एबी फॉर्म पाठवले जातील. जे कोणी निवडणूक लढवणार आहे त्यांनी त्यांचे नाव लिहून पक्षाचा एबी फॉर्म उमेदवारी अर्जासोबत जोडावा, असे पाटील यांनी सांगितले होते, अशी वस्तुस्थितीसुध्दा तांबे यांनी यावेळी विषद केली.

### ए बी फॉर्म योग्यच

तांबेंनी स्पष्टीकरण देताना खोटे आरोप केले आहेत. हे अतिशय क्लेशदायक आहे. त्यांनी आरोप केला की, अमरावती आणि नागपूरचे एबी फॉर्म दिले होते. पण त्यांना जे फॉर्म पाठवले होते, ते फॉर्म बाळासाहेब थोरात यांचे सहकारी सचिन गुंजाळ यांच्याद्वारे पाठवले होते. त्याचे स्क्रीनशॉटही त्यांना पाठवले होते, व्हॉट्सअॅपवर त्यांचा ओके’ असा रिप्लाय आला आहे, हे कोरे एबी फॉर्म आहेत, याचे पुरावे आमच्याकडे आहेत.

- अतुल लोंढे (प्रवक्ते- काँग्रेस)



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



म्हणून मी शेअर मार्केटमध्ये इन्व्हेस्टमेंट करत नाही !

कल्याण
**236-12-570**

## आदित्य ठाकरे यांचे मुख्यमंत्र्यांना
# ओपन चॅलेंज

सुराज्य/मुंबई

’मी राजीनामा देतो मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राजीनामा द्यावा, आणि वरळीत माझ्याविरोधात उभे राहून निवडणूक लढावी’’, असं खुलं आव्हान आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना दिलं आहे.


आदित्य ठाकरे यांनी या आधीही अनेक वेळा शिंदे यांना ओपन चॅलेंज दिले होते. आता पुन्हा एकदा मुंबईमधील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे चॅलेंज दिलं आहे. तसेच ’’जेवढे खोके वाटायचे ते वाटा मात्र, एकही मत विकलं जाणार नाही’’, असे म्हणत ठाकरेंनी शिंदेंना टोला लगावला.

आदित्य ठाकरे म्हणाले, ’’महाराष्ट्रातील १३ खासदार आणि ४० आमदारांनी गद्दारी केली. पण त्या सर्वांना मी आजही चॅलेंज देतो. तुम्ही तुमच्या आमदारकी, खासदारकीचा राजीनामा द्या. त्यानंतर पुन्हा निवडून येता का ते पाहा. मी तर घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांना देखील चॅलेंज दिलं आहे. मी वरळीमधून राजीनामा देतो. तुम्ही माझ्याविरोधात वरळीतून उभे राहा. मग पाहू तुम्ही कसे निवडून येता?’’, असे ओपन चॅलेंज ठाकरेंनी दिले आहे.

’’तुम्ही मुख्यमंत्री आहात ना? मग तुमच्या हातात ताकद आहे. त्यामुळेच म्हटलं वरळीत या आणि निवडणूक लढवा. प्रत्येक आठवड्यात येतात आणि कुठेतरी नारळ फोडण्याचा प्रयत्न करतात. पण तुम्हाला जी यंत्रणा लावायची ती लावा. जी ताकद लावायची ती लावा. काय खोके वाटायचे ते वाटा. मात्र, एकही शिवसैनिक विकला जाणार नाही’’, अशी घणाघाती टीका करत थेट मुख्यमंत्र्यांना आव्हान दिलं आहे. त्यामुळे यावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय उत्तर देतात ते पाहणं महत्त्वाचं असणार आहे.







## अन्नछत्रच्या ऊर्जाबचतीच्या उपाययोजना उल्लेखनीय : देशपांडे

सुराज्य/अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र न्यास हे ऊर्जा बचतीबाबत केलेल्या उपाययोजना ह्या उल्लेखनीय आहेत. राज्यातील धार्मिक संस्थानातील एकमेव असल्याचे मनोगत राज्य वीज नियामक आयोगाचे सचिव अभिजित देशपांडे यांनी व्यक्त केले.

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात ते सहकुटुंब आले असता मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत लातूर परी मंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, सोलापूरचे अधीक्षक अभियंता संतोष सांगळे, ग्रामीणचे कार्यकारी अभियंता रमेश राठोड, अक्कलकोटचे उपकार्यकारी अभियंता संजीव कुमार म्हेत्रे हे उपस्थित होते. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, पुरोहित अप्पू पुजारी, एस. के. स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, राहुल इंडे आदी उपस्थित होते.

# शहरातील ड ३५ आणि अ २८ रेशनदुकानाची अनामत रक्कम जप्त; दंडात्मक कारवाई

### अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांचा दणका

सुराज्य/सोलापूर

अन्नधान्य वितरण प्रणालीच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या रेशन दुकानाची अचानक केलेल्या तपासणींत दोष अढळून आलेल्या दोन दुकानांची अनामत रक्कम जप्त करत दंडात्मक कारवाई करत एका दुकानाची फेरतपासणी करण्याचे आदेश अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी दिले आहे. तर अनेक रेशन दुकानदारांवर कारवाईची टांगती तलावार असल्याने काळा बाजार करणाऱ्या रेशनदुकानदारांचे धाबे दणाणले आहे.

रेशन धान्याचा काळा बाजार केला जात असल्याच्या तक्रारी वाढल्याने चार पथकाच्या माध्यमातून अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी परिमंडल अधिकाऱ्यांना दुकाने तपासणीचे आदेश दिले होते. सलग चार दिवस पथकांच्या माध्यमातून तपासणी केली होती. या तपासणी प्रकरणाचा अहवाल अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला आहे. दोषी असणाऱ्या दुकानदारांवर कारवाईचे सत्र चालू आहे. यापूर्वी तपासणींत दोषी आढळलेल्या दोन दुकानाचा परवाना रद्द केला होता. आता जीवन विकास मागासवर्गीय सहकारी घाऊक व किरकोळ भांडर मर्यादित रास्तधान्य दुकान नंबर ३५ ड दुकानाच्या अहवाल परिमंडळ अधिकारी ब विभाग यांनी तपासणी केलेला अहवालानुसार एप्रिल २२मध्ये पी.एच. एच. गहू१.१९ तर १.७९ तांदूळाची जादा विक्री झाली आहे. जुलै २२ चे साठा रजिष्टर अद्ययावत ठेवले नाही, साठा फलक लावला नाही तर तक्रार नोंदवही दुकानाच्या दर्शनी भागात लावली नाही, असा ठपका ठेवला आहे. नोटीस देऊन त्यांचा खुलासा केला नाही. दुकानाची अनामत रक्कम जप्त करून ५ हजार रूपयाची दंडात्मक कारवाई केली आहे तर स्वकुळसाळी शिक्षण मंडळ रास्तभाव दुकान क्र. ३८ अ या दुकानाचा तपासणी अहवाल परिमंडळ अधिकारी क विभागाचा प्राप्त झाला आहे. त्यामध्ये दुकानाची जागा वरिष्ठांची परवानगी न घेता बदलली बदल केलेली जागा भर चौकात व चारी बाजूने ५ बाय १०चे पत्राचे शेड उभे केले. उपायुक्तांच्या आय. एस. ओ. मानांकनातील कोणतीही पूर्तता ठेवली नाही. तळवट अंतरलेले नाही. दुकान वेळेवर उघडले नाही, शॉप मॅनेजर यांना धान्याचे प्रमाण सांगता आले नाही. दुकान उघडत नसल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी, धान्य कमी मिळत असल्याच्या तक्रारी, ३.८३ क्विंटल गहू तर १.३२ क्विंटल तांदळाची तफावत आढळली. ५.१५ क्विंटल धान्याचा अपहार झाल्याचे आढळून आल्याचा ठपका ठेवला आहे. नोटीसाचा खुलासा असमाधान कारक असल्याने दोषी ठरवत अनामत रक्कम जप्त करत दहा हजाराची दंडात्मक कारवाई केली आहे.



> सर्व परिमंडल अधिकाऱ्यांनी दाखल केलेला अहवाल मोठा आहे. सर्व खातरजमा केली जात आहे. तपासणीत अनेक दुकानदार दोषी आढळले आहेत. त्यामुळे त्यांचा खुलासा पाहून दोषी व्यक्तींवर व दुकानदारांवर कारवाई केली जाईल
>
> **- सुमित शिंदे (अन्नधान्य वितरण अधिकारी)**

> शहरात पोलिसांनी जड वाहतुकीस बंद घातली आहे. त्यामुळे धान्याच्या गाड्या देखील शहरात येण्यास पोलीस प्रतिबंध करत आहेत. त्यामुळे अन्नधान्य वितरणाच्या गाड्यांना परवानगी द्यावी, अशी मागणी पत्र विभागाच्यावतीने दिले असल्याची माहिती शिंदे यांनी दिली.

---

## भंडारकवठ्यातील यात्रेची भाकणूक शेतकऱ्यांसाठी समाधानकारक

### कापूस मध्यम तर कडबा मुबलक प्रमाणात

सुराज्य/द. सोलापूर

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील ग्रामदैवत श्रीमहासिद्ध देवाच्या यात्रेला शनिवारी प्रारंभ झाला. दुपारी कापूस आणि कडब्याची भाकणूक झाली. यंदाचे वर्ष शेतकऱ्यांसाठी अत्यंत मध्यम असल्याचा अंदाज या भाकणुकतून वर्तवण्यात आला.**



यात्रेनिमित्त असंख्य भाविक भंडारकवठेत दाखल झाले आहेत. पुजारी कुंभाराच्या घरातून धुपारती व पूजाविधींचे साहित्य घेऊन मंदिराकडे येतात. महासिद्ध देवाचे मानकरी शावरसिद्ध फुलारी हे महासिद्ध देवाचे मानकरी असलेले विठ्ठल पाटील या मानकरी यांच्या वाड्यातून कापूस आणण्यासाठी जातात. त्यानंतर पाटील यांच्या घरातून येत असताना किती प्रमाणात कापूस घेऊन येतो आणि कशा पद्धतीने व किती प्रमाणात आणतो यावरुन कापसाचा अंदाज बांधला जातो. यंदा मानकरी पाटलाच्या घरातून कापूस आणताना मोठ्या प्रमाणात आणले असून झाकून व थोडे उघडे ठेवल्याने यंदा कापसाचे पीक मध्यम व दर स्थिर राहण्याची शक्यता आहे.

श्री महासिध्द देवाच्या संकेतानुसार तीर्थजल भरुन फुलारी मंदिराकडे परतत असताना रस्त्यात कावळे डावीकडून की उजवीकडून जातात.हे पाहून त्यावरून यंदाच्या पावसाचा अंदाज बांधला जातो. परंतु यंदा कावळे डावीकडून उजवीकडे गेल्याने यंदा पाऊस मध्यम स्वरूपाचा असेल,असा अंदाज वर्तवला गेला. यानंतर गावाजवळील शेतातून फुलारी रात्री डोणजवरुन येणाऱ्या बैलासाठी व रात्रीच्या भाकणुकीसाठी कडबा आणण्यास जातात. फुलारी शेतातून अत्यंत मोठ्या प्रमाणात कडबा घेतला. तसेच फुलारी मंदिराकडे येत असताना अत्यंत सावकाश पावलाने आला असून तसेच मंदिर प्रवेशद्वाराला धक्का लागून एक कडब्याची पेंडी तेथेच पडल्याने यंदा भंडारकठेच्या भाकणुकीची परंपरेत प्रथमच प्रवेशद्वाराला कडबा लागल्याने यंदा मोठ्या प्रमाणात कडब्याचे उत्पादन होऊन ज्वारी मोठ्या प्रमाणात पिकेल, असा अंदाज वर्तवण्यात आला. भाकणूक समाधानकारक झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसले.यंदाच्या भंडारकवठे यात्रेनिमित्त आलेल्या सर्व भाविकांना प्रथमेश पाटील मित्र परिवार, गणेश तरुण मंडळ, विघ्नहर्ता गणेश तरुण मंडळ, अष्टविनायक तरुण मंडळ, जवाहर कमळे मित्रपरिवार, श्रीवरणा ग्रामीण महिला नागरी पतसंस्था, शोभाश्री महिला ग्रामीण नागरी पतसंस्था, श्री महालक्ष्मी ग्रामीण नागरी पतसंस्था अशा अनेक सामाजिक संघटना, मित्रपरिवार, पतसंस्था, बँका यांच्या माध्यमातून महाप्रसादाचे व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी मंद्रुप पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी कोणताही अनुचित प्रकार यात्राकाळात होऊ नये म्हणून अतिशय चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता व मंद्रुप अप्पर तहसील कार्याचे तहसीलदार राजशेखर निंबारे हे उपस्थित होते.



## शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे आ. रणजितसिंह, सातपुते यांना निवेदन

सुराज्य/सोलापूर

विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या राज्य शासनाकडे प्रलंबित असलेल्या ६ मागण्यांसाठी परीक्षावर बहिष्कार आंदोलनाचा शनिवारी तिसरा दिवस आहे.

शहर व जिल्ह्यातील सर्व महाविद्यालतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाबरोबरच बारावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेवर बहिष्कार आंदोलन सुरू ठेवावे, असे आवाहन कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले व सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अभिजित जाधव व सचिव भीमा मस्के यांनी केले आहे.

दरम्यान शनिवारी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, आमदार राम सातपुते व राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्यावतीने निवेदन देण्यात आले. प्रलंबित असलेल्या ६ मागण्यांसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी चर्चा करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

## राशीभविष्य

**दि. ०५ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२३**

### मेष — सहनशीलता ठेवा

सप्ताहातील सर्वच दिवसांचा कालावधी जपून हाताळावा लागेल. सध्या नवीन काहीही न करता शांत राहिलेले चांगले. प्रत्येक गोष्टीमध्ये नियोजन महत्त्वाचे राहील. नोकरदार वर्गाला सहनशीलता ठेवावी लागेल. व्यवसायात पूर्वीपेक्षा अधिक श्रम वाढवावे लागतील. उधारीचे व्यवहार टाळा. आर्थिक बाबतीत खर्च कमी करा. वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घ्या. प्रकृतीची काळजी घ्या. आगामी काळासाठी केलेल्या तरतुदीचा फायदा होईल. आर्थिक सक्षमता येईल.

**शुभ दिनांक : ५, ११**

**महिलांसाठी : दोन शब्द कमी बोललेले चांगले.**

### वृषभ — सुवर्णमध्य साधाल

ठरवून कोणतीही गोष्ट होणार नाही. त्यात चढउतार राहील. मात्र, या चढउताराच्या नादी लागूच नका. हे दोन दिवस आपल्या हातचे नाहीत हे लक्षात ठेवूनच वाटचाल करा. बाकी दिवसांचा कालावधी उत्तम जाईल. नोकरदार वर्गाचे व्यवस्थापन ज्येष्ठांना पटणारे असेल. व्यवसायमार्फत होणारी नवी ओळख ही नफा वाढवणारी ठरेल. मिळणारे उत्पन्न योग्य ठिकाणी गुंतवा.

**शुभ दिनांक : ७,८.**

**महिलांसाठी : धावपळ झाली तरी चांगल्या कामासाठीच होईल.**

### मिथुन — अनावश्यक खर्च टाळा

विचार करून बोलावे लागेल. प्रत्येक गोष्टीत अंदाज वर्तवून चालणार नाही. शिवाय इतरांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवणे त्रासाचे राहील. तेव्हा या दिवसात स्वत:हून व्याप वाढवून घेऊ नका. संयम ठेवा. बाकी दिवस चांगले जातील. नोकरदार वर्गाच्या संशोधनात्मक गोष्टी यशस्वी होतील. राजकीय क्षेत्रात जबाबदारीच्या गोष्टी हाताळाव्या लागतील. कौटुंबिक कलह दूर ठेवा. आध्यात्मिक गोष्टीत मन रमेल. आहाराचे पथ्यपाणी सांभाळा.

**शुभ दिनांक : ८,९.**

**महिलांसाठी : चर्चा करणे टाळा.**

### कर्क — अनुकूल सप्ताह

सप्ताहात सर्व दिवस चांगले असतील. चांगले प्रस्ताव समोर येतील. बऱ्याच वेळा प्रयत्न करूनही थांबावे लागत होते. सध्या मात्र या चांगल्या गोष्टींना गती मिळणार आहे. नोकरदार वर्गाला कामकाजात येणारे तांत्रिक अडथळे दूर होतील. व्यावसायिकदृष्ट्या झालेली संभ्रमावस्था कमी होईल. धाडसी निर्णय घेणे शक्य होईल. गुंतवणूक वाढेल. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. सामाजिक क्षेत्रात अनेकांशी संपर्क साधाल. मुलांना वेळ द्याल. घरामध्ये एखादा महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा होईल. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. धार्मिक गोष्टीतील उत्साह वाढेल. एकूण सप्ताह अनुकूल असेल. प्रकृतिस्वास्थ्य उत्तम राहील.

**शुभ दिनांक : ९,११.**

**महिलांसाठी : तांत्रिक अडचणी कमी होतील.**

### सिंह — मानसिक समाधान लाभेल

दर आठवड्याला कोणता ना कोणता तरी दिवस हा चढउतारांचा राहतो. मात्र आता या आठवड्यात तसे न होता सर्व दिवस चांगले जातील. एखाद्या गोष्टीच्या मागे लागूनसुद्धा ते काम न होणे असा त्रास होत होता, तो तुम्ही भोगला. सध्या कोणाच्या मागे लागण्याची गरज भासणार नाही. स्वत:च्या कर्तृत्वावरच सर्व कामे मार्गी लावाल. नोकरदार वर्गाचे वर्चस्व वाढेल. व्यवसायात उलाढालीचा व्याप उत्तम राहील. आगामी काळासाठी केलेल्या तरतुदीचा फायदा होईल. आर्थिक सक्षमता येईल. सर्वांगीण विकास घडेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या सल्ल्याने महत्त्वाचे निर्णय घ्या. मानसिक समाधान लाभेल. प्रकृती चांगली राहील.

**शुभ दिनांक : १०, ११.**

**महिलांसाठी : अडचणी दूर होतील.**

### कन्या — नियोजन पूर्ण होईल

सप्ताहातील सर्व दिवसांचा कालावधी हा चांगला राहील. प्रत्येक गोष्टीसाठी आता पर्यायी मार्ग स्वीकारावा लागणार नाही. स्वत:च्या मतावर ठाम राहून निर्णय घ्याल. ते यशस्वी होतील. थोडासा निवांतपणा वाटेल. कोणतेही नियोजन परिपूर्ण होईल. नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालू राहील. आर्थिक लाभ होईल. राजकीय क्षेत्रातील कामकाजाला गती येईल. कुटुंबातील सदस्यांना विश्वासात घ्या. धार्मिक गोष्टीत सहभाग राहील. आरोग्य उत्तम राहील.

**शुभ दिनांक : ७,८.**

**महिलांसाठी : हजरजबाबीपणा राहील.**

### तूळ — नियमांचे पालन करा

सहजवारी कोणतीही गोष्ट करून चालणार नाही. काही चांगल्या गोष्टींसाठी बदल स्वीकारा. माझेच खरे करत बसू नका. इतरांचा सल्ला घेताना दगाफटका होणार नाही याची काळजी घ्या. कुठेही उग्र रूप धारण करू नका. एकाच गोष्टीवर अडून राहणे टाळा. कायदा क्षेत्रात नियमांचे पालन करा. नोकरदार वर्गाचा कामातील अनुभव चांगला असेल. व्यवसायात स्वत:ला कष्ट सोसावे लागले तरी चालतील. मात्र, भागीदारी व्यवसायात पडू नका. रोखीच्या व्यवहारांना महत्त्व द्या. आर्थिक बचत करा. राजकीय क्षेत्रात पुढारकीपणा टाळा. कुटुंबातील व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घ्या. स्वत:चेही आरोग्य जपा.

**शुभ दिनांक : ८, ९,**

**महिलांसाठी : कामे वेळेत पूर्ण करा.**

### वृश्चिक — भावनिक निर्णय टाळा

दिनांक ७ आणि ९ रोजी अचानकपणे असे काही प्रस्ताव समोर येतील. त्यामध्ये भावनिक निर्णय घ्यावेसे वाटतील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत भावनिक निर्णय टाळा. व्यावहारिक गोष्टींनाच महत्त्व द्या. बाकी दिवसांचा कालावधी चांगला जाईल. नोकरदार वर्गाला वेळेनुसार व्यवस्थापन करावे लागेल. व्यवसायात ग्राहकांच्या सोयीसाठी योग्य उपाययोजना राबवाव्या लागतील. नाशिवंत मालाची खरेदी मोठ्या प्रमाणात करणे टाळा. आर्थिक बाबतीत हिशोब चोख ठेवा. मित्र-मैत्रिणींसोबत पर्यटनस्थळाला भेट द्याल. मुलांचे लाड पुरवाल. जोडीदाराचा रुसवाफुगवा वेळीच दूर करा. प्रकृतीची काळजी घ्या.

**शुभ दिनांक : ७,९**

**महिलांसाठी : धावपळ कमी करा.**

### धनु — हिशेबाची नोंद ठेवा

दिनांक ८ आणि ९ असे हे दोन दिवस मनस्ताप होणाऱ्या गोष्टींपासून लांब राहा. स्वत:ची कामे इतरांना सांगू नका. इतरांवर अवलंबून राहणे त्रासाचे राहील. कारण नसताना वाद वाढवू नका. क्रोधाला आवर घाला. बाकी दिवस उत्तम असतील. नोकरदार वर्गाने कामाच्या बाबतीत सतर्क राहावे लागेल. आर्थिक बाबतीत खर्च कमी करा. स्वार्थी मैत्रीपासून लांब राहा. घरगुती वातावरण ठीक राहील. शारीरिकदृष्ट्या योगसाधनेला महत्त्व द्या.

**शुभ दिनांक : ५, ९ महिलांसाठी : जिद्द सोडू नका.**

### मकर — आर्थिक लाभ होईल

भाग्य स्थानातून लाभस्थानाकडे चंद्राचे भ्रमण होत आहे. सर्व दिवसांचा कालावधी उत्तम जाईल. अशा या संधीचा फायदा घेऊन थांबलेल्या गोष्टींना गती द्या. उद्याचे कामही आजच करण्याचे नियोजन करा. इतरांचे सहकार्य उत्तम मिळेल. नोकरदार वर्गाला कामाच्या ठिकाणी होणारे नुकसान टाळता येईल. कामात चांगले बदल होतील. राजकीय क्षेत्रात उत्साह वाटणार नाही. नातेवाईकांशी सलोखा वाढेल. भावंडांना समजून घ्याल. धार्मिक गोष्टीत उत्साह राहील. मानसिक शांती लाभेल. आरोग्य साथ देईल.

**शुभ दिनांक : ८,१०**

**महिलांसाठी : आनंदाचे क्षण अनुभवाल.**

### कुंभ — मध्यस्थी करू नका

शब्दाने शब्द वाढणार आहे. तेंव्हा बोलण्यावरती नियंत्रण ठेवा. ज्या गोष्टींची आवश्यकता नाही अशा गोष्टींचा क्षणिक मोह आवरा. इतरांच्या वैयक्तिक गोष्टीत हस्तक्षेप करणे टाळा. समयसूचकतेने काम करा. नोकरदार वर्गाला कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून नियमावली जाहीर होईल. व्यवसायातून मनासारखे उत्पन्न मिळवता येईल. अनेक ठिकाणांहून आलेल्या संधी सोडू नका. आर्थिकदृष्ट्या उधारीचे व्यवहार टाळा. राजकीय क्षेत्रात जबाबदारी वाढेल. नातेवाईकांशी संवाद साधताना मध्यस्थी करायला जाऊ नका. शेजाऱ्यांशी दोन हात लांब राहा. प्रकृतिस्वास्थ्य जपा.

**शुभ दिनांक : ५. ८.**

**महिलांसाठी : कामाचा व्याप वाढवू नका.**

### मीन — वैवाहिक सौख्य उत्तम

दूध पोळलं की ताकसुद्धा फुंकून प्यावे लागेल. ज्या गोष्टींविषयी खात्री नाही अशा गोष्टींची चर्चा करू नका. नकळत आपल्याकडून होणाऱ्या चुकांकडे दुर्लक्ष करू नका. बाकी दिवस चांगले असतील. आर्थिक घडामोडी चांगल्या होत राहतील. समाजसेवेत स्वत:ला वाहून घ्याल. कुटुंबातील सदस्यांची आवड-निवड जपा. वैवाहिक सौख्य उत्तम राहील. धार्मिक गोष्टीतून आनंद मिळेल. योगसाधनेला महत्त्व द्या.

**शुभ दिनांक : ५,९**

**महिलांसाठी : अतिसाहस करू नका.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# स्मार्ट सिटीतील कामे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू

## सर्व विभागांना दिली १५ फेब्रुवारीची डेडलाईन; ४२ कामे १०० टक्के पूर्ण

सुराज्य/सोलापूर

**केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शहरातील एबीडी परिसरातील झालेले विविध प्रकल्प व कामे महापालिकेकडे हस्तांतरित करून घेण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे. ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासंबंधी त्या- त्या संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले होते. मात्र ही प्रक्रिया पूर्ण न झाल्याने आता महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी स्मार्ट सिटी योजनेतून पूर्ण झालेली सर्व कामे हस्तांतरित करून घेण्यासाठी १५ फेब्रुवारी पर्यंतची डेडलाईन दिली आहे. यामुळे आता विभाग प्रमुखांकडून वेगात प्रक्रिया सुरू झाली आहे.**

स्मार्ट सिटी योजनेतून कामे पूर्ण झालेले प्रकल्प महापालिकेकडे हस्तांतरण करून घेण्यासंदर्भात आयुक्त तेली- उगले यांनी गत आठवड्यात आढावा बैठक घेतली. ही प्रक्रिया निर्देश दिल्यानंतर कुठपर्यंत आली आणि आणखी किती वेळ लागेल या संदर्भात संबंधित विभागातील प्रमुखांकडून माहिती घेतली.

याशिवाय पूर्ण झालेली कामे आणि सध्या प्रगतीपथावर असलेल्या कामाचाही आढावा घेतला होता. शहराच्या दृष्टीने महत्त्वकांक्षी मांडल्या जाणाऱ्या उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी च्या कामासंदर्भात येत्या स्मार्ट सिटी प्राधिकरणाच्या संचालक



मंडळ बैठकीत पुढील निर्णय होणार आहे. आयुक्तांनी गत बैठकीत विविध प्रकल्प व कामांचा सविस्तर आढावा घेतला होता. जी कामे पूर्ण झाली आहेत, त्या कामांचे हस्तांतरण करण्यात येणार असून संबंधित विभागाने त्या- त्या कामाविषयी सर्व कागदपत्रे टेंडरप्रमाणे करार शर्ती व अटी तपासून सविस्तर अहवाल एका आठवड्यात महापालिका सादर करण्याचे आदेश दिले होते.

यानंतर ही प्रक्रिया अद्यापही पूर्ण करण्यात न आल्याने आता यासंबंधी दोन आठवड्याची डेडलाईन दिली आहे. यामुळे आता स्मार्ट सिटी योजनेतून झालेली संपूर्ण कामे महापालिका महिनाभरात आपल्या ताब्यात घेणार आहे.

**ही कामे झाली :** स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शहरात एकूण ५१ पैकी ४२ कामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. पार्क स्टेडियममधील क्लब हाऊस जिमखाना, टेबल टेनिस हॉल मुळे पवेलियन, खो-खो, कबड्डी, हॉकी मैदान आदी कामे पूर्ण झाली आहेत. इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर, इमारत बांधकाम, आयटी, इंदिरा गांधी पार्क स्टेडियम फेज- २, सावरकर जलतरण तलाव आदी कामे अद्यापही चालू आहेत.

# माढा ग्रामीण रुग्णालयास शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करू : प्रा.सावंत

## रुग्णालयात महिन्याच्या पहिल्या शनिवारी स्वच्छता दिन पाळला जाणार

सुराज्य/माढा



बाळासाहेबांच्या शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रा शिवाजीराव सावंत यांनी माढा ग्रामीण रूग्णालयास भेट देत रुग्णालयाच्या समस्या जाणून घेत रुग्णालयाच्या स्वच्छतेची पाहणी केली.सर्वसामान्य रूग्णांना आवश्यक त्या आरोग्य सुविधा चांगल्या पद्धतीने मिळाव्यात यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रा तानाजीराव सावंत यांच्या माध्यमातून रुग्णालयास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने शासकिय आरोग्य केंद्रात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी स्वच्छता दिन पाळला जाणार असून या अनुषंगाने प्रा शिवाजीराव सावंत यांनी आज शनिवार, ४ फेब्रुवारी रोजी माढा ग्रामीण रूग्णालयास भेट दिली.

यावेळी प्रा सावंत यांनी रुग्णालयाच्या प्रत्येक विभागांची पाहणी केली.स्वच्छतेविषयक शासनाच्या आदेशान्वये आवश्यक त्या सूचना दिल्या. रुग्णालयाच्या वतीने सर्व विभागास योग्य पाणीपुरवठा होण्यासाठी नवीन प्लबिंग लाईन टाकण्यासह गेटदुरूस्ती छतावरील पाण्याची व्यवस्था रूग्णालया परिसरात पेव्हींग ब्लॉक बनवण्यासह एकुण १९ कामाच्या मागण्या प्रा सावंत सर यांचेकडे केल्याची आहेत.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास आवश्यक त्या सूचना देऊन तातडीने कामे मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले. यावेळी आरोग्यमंत्री प्रा तानाजीराव सावंत यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण लटके, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव कानडे, तालुका प्रमुख मुन्ना साठे, प्रा. शिवाजीराव सावंत सरांचे स्वीय सहाय्यक संजय ढेरे, वैद्यकिय अधिक्षक डॉ. नंदकुमार घोळवे, माढा शहर शिवसेनाप्रमुख खरात, युवासेना जिल्हाप्रमुख सत्यम लोंढे, युवा सेना शहरप्रमुख स्वप्निल खरात, डॉ. ऐतनाळकर, डॉ.भंडारे आदिसह रूग्णालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## हलदहिवडीच्या उपसरपंचपदी चव्हाण

**सांगोला :** हलदहिवडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी सौ. सुनिता प्रभाकर चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच पदासाठी निवड प्रक्रिया ग्रामपंचायतीच्या कार्यालयात पार पडली. ग्रामपंचायतीचे उपसरपंच अश्विनी येडगे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी सुनिता चव्हाण यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. सरपंच प्रतिक्षा गायकवाड यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी ग्रा.पं.सदस्य रूपाली लेंडवे, रुक्मिणी कदम, मंदाकिनी चव्हाण, अश्विनी येडगे, सुरेखा फाळके, रफिक शेख, विश्वनाथ चव्हाण, बाबुराव लेंडवे धनाजी चव्हाण, यशवंत चव्हाण, प्रभाकर चव्हाण, सिद्धार्थ गायकवाड, गणेश कदम, नितीन चव्हाण, रमेश कुंभार, रामचंद्र पाटील, सिद्धेश्वर चव्हाण, वसंत खजिने, राहुल पाटील, शिवाजी सातपुते, श्रावण चव्हाण, तानाजी चव्हाण, अमर येडगे, गोरख लेंडवे आदी उपस्थित होते. सचिव म्हणून कामकाज ग्रामसेवक मंगेश पोरे यांनी पाहिले.

# शिवसेना प्रत्येक प्रभागात जनता दरबार भरविणार : कारमपुरी

सुराज्य/सोलापूर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने लवकरच प्रत्येक प्रभागात उपशहर प्रमुखांच्या माध्यमातून जनता दरबार बरं मिळण्यात येणार असल्याची घोषणा शिवसेना शहर प्रमुख विष्णू कारमपुरी यांनी केली आहे

शहरात येणाऱ्या सर्व विधानसभा मतदार संघ निहाय बैठका सुरू आहे त्या अंतर्गत ४ फेब्रुवारी रोजी द. सोलापूर विधानसभा मतदारसंघातील शहरी भागातील बैठक जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व शहर प्रमुख विष्णु कारमपूरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि उपजिल्हाप्रमुख भीमाशंकर म्हेत्रे, संतोष केंगानाळर, संघटक राजू बिराजदार, अक्कलकोट विभागाचे उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, समीउल्ला शेख यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत कारमपुरी यांनी शिवसेना प्रत्येक प्रभागात जनता दरबार भरविण्याची घोषणा केली. सर्व पदाधिकाऱ्यांचे स्वागत संतोष पाटील यांनी केले बैठकीत वरील प्रमुख मान्यवरांसह शिवाजी खाकरे, सिध्दाराम खोरे ,अजय खांडेकर, सुनील यादव, राम भरले राजू खडाखडे, प्रकाश पवार, विजय भरले, राजेंद्र जाधव, रविकांत कांबळे, भागवत जोगदनकर, रामबागसे, सचिन माने, उमेश लोखंडे, महेश गिराम, विक्रम खंडागळे, महेश मस्के यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते




### अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करा : अमर पाटील

शिवसेना पदाधिकारी आपल्या दारी या मोहिमेंतर्गत संपूर्ण दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात पिंजून काढून गाव तेथे शाखा घर तेथे शिवसैनिक असे वातावरण निर्माण करण्यात येईल, अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व शिवसैनिक पदाधिकारी सहकार्य करावे असे आवाहन यावेळी जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी केले.

# अल्पवयीन पिडीतेवर अत्याचार केल्याप्रकरणी वृद्धास सक्तमजुरी

**सोलापूर :** फिर्यादी व नातेवाईक फितूर होवून सुध्दा अल्पवयीन पिडीतेवर शारिरीक अत्याचार केल्याप्रकरणी ७६ वर्षाच्या जगनू धनजू चव्हाण यास पाच वर्षांची सक्तमजूरीची शिक्षा विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी ठोठावली.

पिडीतेचे आई-वडील दोघेही कामासाठी शेतात गेले. जाताना त्यांच्या मुलांना फिर्यादी म्हणजे पिडीतेच्या मामाच्या घरी सोडून गेले. पिडीता दिसली नाही, म्हणून मामाने चौकशी केली असता पिडीता आरोपीच्या घराकडे खेळत असल्याचे कळाल्याने फिर्यादीने आरोपीच्या घराजवळ जावून पिडीतेचा शोध घेतला असता पिडीता मिळाली नाही. आरोपीच्या घराबाहेर असलेल्या बाथरुमचा दरवाजा लोटुन पाहीले असता त्या ठिकाणी आरोपी हा पिडीतेवर अत्याचार करीत असल्याचे दिसून आले. आरोपीला पकडून पोलीसांच्या ताब्यात देवून पिडीतेच्या मामाने तक्रार दाखल केली. तपास पोलीस उपनिरीक्षक सी.बी.बेरड यांनी करुन आरोपीविरुध्द दोषारोपत्र दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश शिरभाते यांच्यासमोर झाली.यात सरकारतर्फे अॅड प्रकाश एस.जन्नु यांनी पिडीता ही अल्पवयीन असल्याचे माहित असूनही आरोपीने पिडीतेवर शारिरीक अत्याचार केल्याचे साक्षी पुराव्यादवारे न्यायालयाच्या निर्दशनास आणले. सरकारतर्फे पिडीता,ठाणे अंमलदार व तपासी अंमलदार यांची साक्ष महत्वपुर्ण ठरली. सरकारतर्फे अॅड प्रकाश जन्नु, अॅड एम.एम.देशपांडे यांनी तर आरोपीतर्फे अॅड. एच.एच. बडेखान यांनी काम पाहिले.

**फिर्यादीच झाला फितूर**

पिडीतेचे वडील हे सरकार पक्षास मदत न करता फितूर झाले.तथापी पिडीतेने घडलेली घटना न्यायालयासमक्ष कथन केली.त्यामुळे पिडीतेची साक्ष ग्राह्य धरुन आरोपीस शिक्षा देण्यासंबंधी सरकारी वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन विशेष न्यायालयाने अल्पवयीन पिडीतेवर शारिरीक अत्याचार केल्याचे ग्राह्य धरुन आरोपी जगनू चव्हाण यास ५ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा तसेच एक हजारांचा दंड ठोठावला.



# खिलारे यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्यांवर कारवाई करा : लहुजी शक्तीसेना

सुराज्य/सोलापूर

सुशांत खिलारे (वय २२, रा.कासेगाव, ता.पंढरपूर) यांच्या मृत्यूप्रकरणी वीटभट्टी मालक व त्यांचे सहकाऱ्यांविरोधात दलित अत्याचार विरोधी कायद्यांतर्गत व डांबून ठेवणे, अपहरण करणे आदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी लहुजी शक्तीसेना सोलापूर जिल्हा यांच्यावतीने शिष्टमंडळाने उपजिल्हाधिकारी शमा पवार व ग्रामीण पोलिस अधिक्षकांकडे केली आहे. त्यांच्या वारसांना उदरनिर्वाहाकरिता शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

यावेळी प्रदेश अध्यक्ष महादेव भोसले, अनिल बनसोडे, अप्पा बनसोडे, वसंतराव देडे, शशिकांत कसबे, राम कांबळे, दिपक खंडागळे, अण्णा भालेराव, सुरज जाधव, सुनिल रणदिवे, किरण क्षिरसागर आदींनी निवेदन देत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## संपातील कर्मचारी परीक्षेचे काम करणार नाहीत

सुराज्य/सोलापूर

दोन फेब्रुवारीपासून स्थगित करण्यात आलेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा सोमवार ६ फेब्रुवारीपासून घेण्याचे परीक्षा विभागाने जाहीर केले आहे. पर्यायी व्यवस्था करून परीक्षा पार पाडाव्यात अशा सूचना त्यांनी जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांना दिल्या आहेत.

परंतु विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे परीक्षावरील बहिष्कार आंदोलन सुरू असून संपातील कोणतेही कर्मचारी परीक्षेचे काम करणार नाहीत. लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत परीक्षा बहिष्कार आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असे सोलापूर विद्यापीठ संघटनेचे अध्यक्ष सुनील थोरात व सरचिटणीस रविकांत हुक्किरे, कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले व सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, अशासकिय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अभिजित जाधव व सचिव भीमा मस्के यांनी कळविले आहे.

# माजी सैनिक, पोलीस, पत्रकार, शिक्षकांना प्रत्येकी ७५ घरे देणार; करजगी यांची घोषणा

**सोलापूर :** जुने मिल येथील शिल्लक पाच एकर जागेवर माजी सैनिक, पोलीस, पत्रकार, शिक्षक यांना प्रत्येकी ७५ घरे (सदनिका) देणार असून यासाठी समिती संस्था स्थापन करून दि. ९ मार्चपर्यंत जागा त्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे, अशी घोषणा ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्वतः कामगार नेते कुमार करजगी यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

आता जुनी मिलच्या शिल्लक असलेल्या जागेवरती कामगारांचे वारस , माजी सैनिक, पोलीस, शिक्षक, पत्रकार सर्वांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सोलापुरतील प्रतिष्ठित अशा पत्रकार, संपादक, वकील, इंजीनियरिंग, सीए अशा शहरातील १८ व्यक्तींची एक कमिटी करून जुनी मिल जागेवर गृह प्रकल्प उभारण्याचे स्वप्न ७५ वर्षाच्या पदार्पणात पूर्ण करायचे आहे. दि. ९ मार्चच्या आत कायदेशीर मंडळींची समिती संस्था स्थापन करून दि. ९ मार्चपर्यंत जागा त्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे, असे कामगार नेते कुमार करजगी यांनी स्पष्ट केले. जुनी मिल कंपाऊंडमध्ये पाच एकर जागा माझ्याकडे शिल्लक राहत आहे. ती जागा ७५ माजी सैनिक, ७५ पोलीस, ७५ शिक्षक ७५ पत्रकार ७५ गेल्या ४० वर्षापासून माझ्या संघर्ष लढ्यामध्ये मला सहकार्य करणाऱ्या मित्रांना त्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मिलची राहिलेली ५ एकर जागा देण्याची इच्छा दोन वर्षांपूर्वी जाहीर केली होती. सन १९८८ साली ज्या प्रतिष्ठित असे डॉक्टर, संपादक, वकील मंडळी मुळेच अशक्य असलेले काम पूर्ण करू शकलो. ती मंडळी खंबीरपणे पाठीशी उभारल्यामुळे आता जुनी मिलच्या शिल्लक असलेल्या जागेवरती कामगारांचे वारस, माजी सैनिक, पोलीस, शिक्षक, पत्रकार सर्वांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सोलापुरतील प्रतिष्ठित १८ व्यक्तींची एक कमिटी करून जुनी मिल जागेबाबतचे स्वप्न ७५ वर्षाच्या पदार्पणात पूर्ण करायचा आहे.

९ मार्चच्या आत कायदेशीर एक वरील मंडळींची कमिटी संस्था स्थापन करून ९ मार्चपर्यंत जागा त्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे, असे कामगार नेते करजगी यांनी स्पष्ट केले. ९ ऑगस्ट १९८८ रोजी सुरू असलेला जुनी मिलचा विषय आता ९ ऑगस्ट २०२३ रोजी सर्व जागा संस्थेच्या ताब्यात देऊन मला जुनी मिलच्या सर्व व्यवहारातून मुक्त व्हायचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

**शहराला गतवैभव प्राप्त करून द्यायचे स्वप्न!**

सोलापूरच्या विमानतळ, आयटी पार्क व सोलापूरच्या विकासासाठी संघर्ष लढा उभा करून पुन्हा सोलापूर शहराला गतवैभव प्राप्त करून द्यावयाचे स्वप्न आहे. निस्वार्थ, प्रामाणिकपणे, योजनात्मक संघर्ष केल्यास जगात कुठलेच काम अशक्य नसते. या एकाच हेतूने आपण सर्वांनी सोलापूरच्या विकासासाठी एकत्र यावे असे आवाहन कामगार नेते कुमार करजगी यांनी केले आहे.



# कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांची जयंती साजरी

सुराज्य/बार्शी

आकर्षक पेहराव केलेले एकाच वेशभूषेतील विदयार्थी...ढोल ताशाचा गजर.. लाठी काठी, तलवारबाजी असे मर्दानी खेळाचे सादरीकरण.. विविध प्रशालेच्या विदयार्थिनींचे लेझीम, टिपरी नृत्य..रूक्माई गीत.. देशभक्तीपर गीते..अमर रहे अमर रहे..जगदाळे मामा अमर रहे..अशा उत्साही वातावरणात जनजागरण फेरी काढून कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या १२० व्या जयंती साजरी करण्यात आली.

या जनजागरण फेरीतून विविध प्रशालेंच्या पथनाटय व चित्ररथांनी सामाजिक एकता, राष्ट्रीय एकात्मता, संविधान सन्मान, ग्रामस्वच्छता. रस्ता सुरक्षा जाणीव जागृती, पर्यावरण रक्षण, पाण्याची बचत, आरोग्य जनजागृती, अवयवदान, व्यसनमुक्ती असे सामाजिक संदेश दिले. शहरातील प्रमुख मार्गावरून ही जनजागरण फेरी जात असताना शहरवासियांनी कमानी उभारून उत्फूर्त स्वागत केले. मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. प्रारंभी सकाळी तुळजापूरहून



आलेल्या कर्मवीर ज्योतीचे संस्था पदाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. जनजागरण फेरीचे उदघाटन मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष डॉ.बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव अरूण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, रमेश पाटील, व्ही.एस.पाटील, डॉ.गुलाबराव पाटील, प्रा.दिलीप रेवडकर, डॉ.प्रकाश बुरगुटे, प्रताप जगदाळे, प्रा.डॉ.सुरेश लांडगे, प्राचार्य एस के पाटील, प्राचार्य डॉ.दिपक गुंड यांच्यासह विविध प्रशालेचे प्राचार्य उपस्थित होते. जनजागरण फेरीच्या अग्रभागी ट्रॉलीमध्ये कर्मवीर जगदाळे मामांचा पूर्णाकृती पुतळा व त्यानंतर विविध शाळा महाविद्यालयांची पथके सहभागी झाली होती. जिजामाता विद्यामंदिर, शिशु संस्कार केंद्र, महात्मा फुले विदयामंदीर, शिशु संस्कार प्राथमिक विद्यामंदीर, जिजामाता कन्या प्रशाला, महाराष्ट्र विद्यालय, शंकरराव निंबाळकर अध्यापक विदयालय, कर्मवीर कृषी तंत्र विदयालय, शिक्षणशास्त्र महाविदयालय, शिवाजी महाविदयालय, बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज, राजर्षी शाहू विधी महाविदयालय, कॉलेज ऑफ नर्सिंग, जगदाळे मामा हॉस्पीटल व त्यानंतर जामगांव येथील आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्राचा व्यसनमुक्तीबाबत संदेश देणारा रथ यांचा या जनजागरण मिरवणूकित सहभाग होता.

### जनजागरण फेरीचे चौका-चौकात स्वागत

जनजागरण फेरीच्या निमीत्ताने विद्यार्थी, विदयार्थिनींनी फेटे, तसेच पारंपारिक पोशाख अशा पेहरावात लेझीमसह विविध नृत्याचे सादरीकरण केले. सवादय निघालेली ही आकर्षक जनजागरण फेरी पाहण्यासाठी शहरवासियांनी गर्दी केली होती. शहरातील विविध सामाजिक संस्था, संघटनांच्यावतीने जनजागरण फेरीचे चौकाचौकात स्वागत करण्यात आले.

# मराठा सेवा संघाच्यावतीने छत्रपती महोत्सवाचे आयोजन

### जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील यांची माहिती

**सोलापूर :** मराठा सेवा संघाच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे छत्रपती महोत्सवाचे आयोजन केले आहे. १९ ते २४ फेब्रुवारी पर्यंत विविध कार्याक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मराठा सेवा संघाचे जिल्हाअध्यक्ष प्रशांत पाटील यांनी दिली.

मराठा सेवा संघाच्या कार्यालयात छत्रपती महोत्सव नियोजन मिटींग झाली. या बैठकीमध्ये छत्रपती महोत्सवाचे नियोजन करण्यात आले. १९ रोजी जिल्हा परिषद शाखेच्या वतीने ८.१५ वा. जिल्हा परिषदेच्या उद्यानातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन केले जाणार आहे. त्यानंतर जि.प. सभागृहात सकाळी पोवड्याचास कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर शिवाजी महाराज चौकातील पुतळ्यास अभिवादन केले जाणार आहे. त्यानंतर १२.१५ वाजता मराठा सेवा संघ जिल्हा कार्यालयात शिवप्रतिमापूजन व अभिवादनाचा सोहाळा होणार आहे तर २० ते २४ फेब्रुवारी पर्यंत शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी , महिला, जेष्ठ नागरीक, यासाठी विविध कार्याक्रमाचे आयोजन केले आहे. या बैठकीत ८ व ९ एप्रील रोजी होणाऱ्या केंद्रीय कार्यकारणी मिटींग आयोजनाविषयी चर्चा करण्यात आली. यावेळी कक्षांच्या निवडी करण्यात आल्या. यामधे राजर्षी शाहु महाराज शिक्षण परिषदेच्या जिल्हाध्यक्ष पदी उत्तर सोलापूरचे हणमंत चव्हाण यांची तर सदस्य म्हणून संदीप पाटील यांची निवड करण्यात आली. बार्शी तालुक्यातील युवा संस्था चालक निलेश गायकवाड यांचे नाव राज्य कार्यकारणीसाठी प्रस्तावित करण्यात आले. संत गाडगे महाराज प्रबोधन कक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदी सेवा संघाचे ज्येष्ठ सदस्य संतोष काळुकेसर यांची निवड करण्यात आली. तर ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदी नवानाथ कदम यांची निवड करण्यात आली. यावेळीप्रकाश नणवर,नितीन भोसले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या बैठकिस संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, वीर भगतसींह विद्यार्थी परिषद जिल्हाध्यक्ष परशुराम पवार, नौदल अधिकारी विश्वनाथ गायकवाड, वधु-वर कक्षचे नवनाथ कदम, शहराध्यक्ष सदाशिव पवार, जिल्हासचिव लक्ष्मण महाडिक, कार्य. सदस्य शैलेश साठे, सहसचिव कल्याण गव्हाणे, कार्यलयीन सचिव नागनाथ



# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर ई-चलानद्धारे कारवाई

**१ लाख २१ हजार वाहनधारकांना पाठवल्या नोटीसा**




**सोलापूर** : पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर अंतर्गत वाहतूक नियंत्रण विभागातर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर ई-चलानव्दारे कारवाई करण्यात येत आहे.ज्या वाहन धारकांनी त्यांना देण्यात आलेल्या ई-चलान तडजोड रक्कम अद्याप पर्यंत भरलेली नाही अशा १ लाख २१ हजार ६९४ इतक्या वाहन धारकांना एस.एम.एस.व्दारे नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या लोक अदालित मध्ये यावर निर्णय होणार आहे.त्यामुळे या वाहनधारकांनी सकाळी अकरा वाजता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर येथे लोक अदालतमध्ये उपस्थित रहावे असे या नोटीसा द्वारे कळविण्यात आले आहे.खाजगी वाहतूक करणारे प्रवासी बसेस (लक्झरी),जडवाहने,काळी-पिवळी रिक्षा व इतर दुचाकि वाहनांचा समावेश असून,त्यांनी शक्य तितक्या लवकर दंडाचा भरणा करावाचे आवाहन करण्यात आले आहे.ज्यांना न्यायालयात जाणेची इच्छा नाही त्यांनी ई-चलनाची देय रक्कम शक्य तितक्या लवकर भरणा करण्याकरीता विविध सुविधा उपलब्ध करण्यात आले आहेत.

### मृत्यूस कारणीभूत; डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर** : मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी डंपर चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी सोजर पंढरीनाथ कवडे (वय-४०,रा.दक्षिण कसबा,शिंदे चौक) व त्यांचा मुलगा श्रीपाद पंढरीनाथ कवडे (वय-९) असे मिळून दि.२२ जानेवारी रोजी एक्टिवा दुचाकीवरून शिवाजीनगर बाळे येथून दिराच्या घराकडून कपडे घेऊन परत येत होते.त्यावेळी जुना पुना नाका येथील गणपती मंदिर समोर हायवा डंपर क्रमांक एम.एच.१३. सीयु.४९८७ यातील चालकाने (नाव पत्ता माहीत नाही) निष्काळजीपणाने व हायगयीने वाहन चालून सोजर यांच्या दुचाकीला धडक दिली.त्यावेळी सोजर व त्यांचा मुलगा खाली पडले.दरम्यान मुलगा श्रीपाद हा डंपरच्या पाठीमागील चाकाखाली आल्याने त्याच्या पोटावरून चाक गेल्याने त्यात तो गंभीरित्या जखमी होऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.घ टनेचा पुढील तपास पोसई भोईटे हे करीत आहे.

### खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून फसवणूक

**सोलापूर** : खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून बोगस नोंदी घेऊन दमदाटी व जबरदस्ती केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.३१ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास नगर भूमापन कार्यालय सोलापूर येथे घडली.याप्रकरणी समीर अकबर खाटीक (व्यवसाय-नोकरी भूमापन कार्यालय सोलापूर,रा. सिद्धेश्वर पेठ,सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सिद्धाराम चन्नप्पा बिराजदार (वय-५४,रा.महात्मा बसवेश्वर चौक, शेळगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे समीर हे त्यांच्या शासकीय कार्यालयामध्ये कर्तव्य बजावत असताना वरील संशयित आरोपी याने मिळकत पत्रिकावर वारस नोंदीकामी सिद्धाराम बिराजदार यांनी कार्यालयात अर्ज सादर केले होते.त यावेळी अर्जा सोबत केलेल्या प्रतिज्ञापत्रात चन्नप्पा बिराजदार यांचे वारस म्हणून सिद्धाराम बिराजदार हेच एकटे असल्याने नमूद केलेले होते.परंतु मयत गणपती बिराजदार यांना एकूण चार आपत्य वारस होते. त्याचा उल्लेख न करता खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून फसवणूक केली. तपास पोसई बेंबडे हे करीत आहेत.

### प्लास्टिकची बाटली लागल्याने लाथाबुक्यांनी मारहाण

**सोलापूर** : फिर्यादी व फिर्यादी यांचा भाऊ आश्विनी हॉस्पिटल येथे बोलत थांबले असता तेथील थांबलेल्या चौघापैकी एकाने प्लास्टिकची बाटली फेकली व ती फिर्यादी यांच्या भावास लागल्याने शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना दि.१ फेब्रुवारी रोजी रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास अश्विनी हॉस्पिटल जवळ घडली. याप्रकरणी इमानीयल सुमित्र गुमळे (वय-३३,रा. मौलाली चौक) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून कन्हैया बाडीवाले, अर्जुन मैनावाले, सागर बिरबनवाले, दिनेश कोलाकाटी (सर्व रा.लष्कर, लोधी गल्ली, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे पुढील तपास मपोना.वाघमोडे या करीत आहेत.

# जडवाहतूक बंदीचा फेरविचार व्हावा; मंगल भांडार असोसिएशनची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

शहरात दिवसा जडवाहतुकीस घातलेल्या बंदीमुळे व्यापारावर मोठा परिणाम होणार असून त्यामुळे व्यापारी, व्यावसायिक, नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागेल, त्यासाठी जडवाहतूक बंदीच्या निर्णयाचा पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी फेरविचार करावा, अशी मागणी मंगल भांडार वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांनी केली आहे.



अपघात रोखण्यासाठी जड वाहतुकीस केलेली बंदी म्हणजे रोग रेड्याला, इंजेक्शन पखालीला असा प्रकार असल्याचे सांगून हिंगमिरे म्हणाले, शहरातील खराब रस्ते, रस्त्यालगतचे अतिक्रमण, पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन होऊनही आत्तापर्यंत होऊ न शकलेले उड्डाणपूल, बंद असलेले सिग्नल, सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण, फेरीवाले व भाजी विक्रेत्यांनी बळकावलेले पदपथ, अपघातप्रवण क्षेत्रात नो पार्किंगचा आदेश असतानाही थांबवल्या जाणाऱ्या जीप, रिक्षा, ट्रॅव्हल्स यासह अनेक घटक अपघाताला कारणीभूत असताना केवळ जड वाहतुकीला वेठीस धरणे अयोग्य आहे. दिवसा जडवाहतूक बंदीचा अंमल सुरू झाल्याने व्यापारावर परिणाम होत आहे.

अपघाताला आळा घालण्यासाठी रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याची गरज असून आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक पोलिसांची नेमणूक करावी. सर्व प्रकारच्या जडवाहतुकींना ठराविक रस्त्यावरूनच प्रवेश दिला पाहिजे, वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाचा परवाना निलंबित करून प्रसंगी वाहन ठराविक दिवसांसाठी जप्त करण्याची कारवाई केली तर बेशिस्त वाहन चालकांना वचक बसेल. मंगल भांडारसह अन्य व्यवसायिकांना येणाऱ्या समस्यांचा विचार करता पोलीस आयुक्तांनी जडवाहतूक बंदीचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी वीरेंद्र हिंगमिरे, कार्याध्यक्ष अशोक श्रीराम, उपाध्यक्ष एजाज शाब्दी, सचिव मधूकर चिम्मन, सल्लागार शशिकांत पाटील यांनी केली आहे.

## आदिवासी कोळी समाजाचा वधूवर मेळावा

**सोलापूर** : बटगेरी सामाजिक प्रतिष्ठान, सोलापूर संचलित आदिवासी कोळी समाजाचा ११वा वधूवर मेळावा श्री शिवछत्रपती रंगभवन येथे पार पडला. मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष महादेवबुवा शहाबाजकर, अखिल भारतीय कोळी समाज महाराष्ट्र राज्य परेश कोळी, अखिल भारतीय कोळी समाज कार्याध्यक्ष म. राज्य सिद्धार्थ कोळी, मुख्य लेखाधिकारी सोमपा रुपाली कोळी, माजी नगरसेविका चंद्रिका चौहान व वधूवर मार्गदर्शिका या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महर्षी वाल्मिकी प्रतिमा पूजनाने करण्यात आले. कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते गुणीजनांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्यास महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण येथून वधूवर व पालक आले होते. १४० वधूवरांची नोंदी करण्यात आल्या. मेळाव्याचे प्रास्ताविक अध्यक्ष शंकर बटगेरी यांनी केली. सूत्रसंचालन व आभार हणमंत मोतीबने यांनी केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी रेवणसिद्ध कोळी, शिवलिंग कोळी, शिवपुत्र जमादार, नागनाथ दोरनाळे, बापूराव जमादार, रवी देवरनादगी, सुधाकर मिरजकर आदि कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## डीएम युवक प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांची निवड

**सोलापूर** : डीएम युवक प्रतिष्ठानच्यावतीने सात रस्ता येथे शिवजन्मोत्सव सोहळा २०२३ साजरा करण्यासाठी गोविंदश्री मंगल कार्यालय येथे पदाधिकाऱ्यांची निवड व वार्षिक आढावा बैठकीचे आयोजन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष निखिल भोसले यांच्या अध्यक्षतेखाली व पृथ्वीराज दिलीप माने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत २०२३ साठी नवीन पदाधिकारी म्हणून सनी देवकते यांची अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्ष तेजस साबळे, प्रथमेश गायकवाड, सचिव निखिल खांदगे, सहसचिव शुभम ताकमोगे, खजिनदार प्रवीण झिंजुर्डे, कार्याध्यक्ष वसिम उस्ताद, मिरवणूक प्रमुख नितीन भोपळे-पाटील, श्रीकांत मेलगे-पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीस आकाश जाधव, धनराज शिंदे, शाम कदम, अक्षय जाधव, स्वप्निल मोरे, बाळकृष्ण जाधव, श्रीकांत कोळी, आकाश पवार व मंडळाचे सर्व पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

## शिवशिंपी समाजातर्फे अंजनी भद्रे हिचा गौरव

**सोलापूर** : महाराष्ट्र राज्यात पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात ९वा क्रमांकाने यशस्वी झाल्याबद्दल सोलापूर येथे शिवशिंपी समाजाचा अखिल भारतीय प्रथम वधूवर मेळाव्यात खा. डॉ. जयसिद्धेश्वर महाराज, आमदार विजयकुमार देशमुख, शिवशरण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कर्नाटक राज्याचे अतिरिक्त सचिवा अपर्णा पावटे यांच्या हस्ते तिचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. परीक्षेला महाराष्ट्रातून ५ लाख विद्यार्थी बसले होते. त्यातून कोल्हापुराती टेंबलाईवाडी विद्यालयामार्फत परीक्षा देऊन तिने यशस्वीरित्या ९वा क्रमांक पटकाविला. कोल्हापुरात ही राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते हिचा गौरव करण्यात आला. यशासाठी वर्गशिक्षिका गायकवाड, मुख्याध्यापक तसेच आई-वडिलांचे तिला मार्गदर्शन लाभले.

## श्री सिद्धेश्वरच्या खेळाडूंचे राष्ट्रीय स्पर्धेत यश

**सोलापूर** : श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित सिद्धेश्वर इंग्लिश मीडिम हायस्कूलचा विद्यार्थी तेजस मनोज कलागते याने Tang Soo Do Sports Association of Ahmadnagar आयोजित State Level TANG SOO DO CHAMPIONSHIP 2022-23 शिर्डी येथे पार पडलेल्या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविले असून या विद्यार्थ्यास प्रशालेचे क्रीडा शिक्षक श्रीकांत चन्नापट्टण यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, इंजि. बऱ्हाणपुरे, डॉ. राजशेखर येळीकर, गुरुराज माळगे, भिमाशंकर पटणे, मल्लिकार्जुन कळके, समन्वयक संतोष पाटील व तसेच शाळेचे मुख्याध्यापक सतीश गोसावी व पर्यवेक्षक शिवराज बिराजदार या सर्वांनी अभिनंदन केले.

## रोशन प्रशालेतील दोघांची इनस्पायर ॲवार्डसाठी निवड

**सोलापूर** : भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स व टेक्नोलॉजी यांच्यावतीने शालेय स्तरावरील नवकल्पना असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड केली जाते. यावर्षी आमच्या प्रशालेतील स्नेहल सराटे (इ. ६वी) व भाग्येश भट्टरकी (इ. ६वी) या दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येकी दहा हजार रुपये इतकी रक्कम या विजेत्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नवकल्पनेसाठी मिळणार आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची प्रशालेचे मुख्याध्यापक बी. जी. इंगळगी यांनी कौतुक केले. सदर विद्यार्थ्यांना प्रशालेचे विज्ञान सहशिक्षक एस. बी. मळळी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# पाणथळ दिनानिमित्त पोलीस प्रशिक्षण केंद्रात नेचर वॉक

**सुराज्य/सोलापूर**



जागतिक पाणथळ दिनाच्या निमित्ताने पर्यावरण विभाग, महानगरपालिका, पोलीस प्रशिक्षण केंद्र आणि इको फ्रेंडली क्लब यांच्यावतीने नेचर वॉक आणि पक्षी तज्ज्ञांशी संवाद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

केगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात असलेल्या पाणथळ परिसरात शुक्रवारी सकाळी हा उपक्रम पार पडला. तसेच प्रारंभी केगाव परिसरात मृत्युमुखी पडलेल्या काळविटांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य डॉ. वैशाली कडूकर, सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त श्री मच्छिंद्र घोलप यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार, पर्यावरण अभ्यासक श्री शिवानंद हिरेमठ यांनी उपस्थित निसर्गप्रेमींना मार्गदर्शन केले. निसर्गरम्य वातावरणात नेचर वॉक करून सर्वजण आनंदून गेले होते. पाणथळ परिसर आणि पक्षी जगताविषयी माहिती सर्वांनी जाणून घेतली. याप्रसंगी महानगरपालिकेचे पर्यावरण अधिकारी स्वप्निल सोलनकर, उद्यान अधीक्षक रोहित माने, पोलीस निरीक्षक दत्ता कोळेकर, प्रवीणकुमार कांबळे, सुशांत व्हराळे, संग्राम थोरात सिद्धेश्वर जंगम, राखीव पोलीस निरीक्षक भरत सावंत, दीपक लोणकर, अण्णासाहेब वाघमोडे, रोहिणी मच्छिंद्र घोलप, शोभा कुंभार, वृषाली कुंभार, अजित कोकणे, आदी उपस्थित होते. इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक परशुराम कोकणे यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. वाईल्ड लाईफ कंजर्वेशन असोसिएशनचे अध्यक्ष अजित चौहान यांनी आभार मानले.

## विवाहितेचा छळ

**सोलापूर** : घरातील किरकोळ कारणावरून विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी स्नेहल रेनॉन नंदाल (वय-३४, रा.जोडभावी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती रेनॉन नंदाल, बालाजी नंदाल, पद्मावती बालाजी नंदाल, रेगन बालाजी नंदाल, प्रसन्न बालाजी नंदाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## सत्तर फूट येथे कारच्या धडकेत वृद्ध गंभीर जखमी

**सुराज्य/सोलापूर**

भाजी खरेदी करत असताना कार क्र.एम. एच.१३.डीवाय.९१४२ या कारच्या चालकाने कार हायगयीने व निष्काळजीपणे चालवून एका वृद्धाला जोऱ्याची धडक देऊन गंभीर जखमी केल्याची घटना दि. ७ जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान सत्तर फूट भाजी मार्केट अशोक चौक येथे घडली.

याप्रकरणी नारायण तिमप्पा भंडारी (वय-६४,रा.न्यू पाच्छा पेठ, अशोक चौक) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शाहरुख दाऊद फुलारी (वय-२५, रा.शिवगंगा नगर भाग ३, नई जिंदगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे वरील ठिकाणी भाजी खरेदी करत असताना कारचालकाने त्याच्या ताब्यातील कार भरधाव वेगात चालवून फिर्यादी यांना पाठीमागून धडक देऊन गंभीररित्या जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

## प्रभाकर स्वामी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

**सोलापूर** : प्रभाकर स्वामी महाराज यांच्या ६६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त सोमवारी ६ रोजी रात्री १०.४५ वाजता सम्राट चौकातील श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात गुलालाचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारपर्यंत मंदिरात अखंड नामजप सप्ताह श्री गुरुगीता पारायण करण्यात येत आहे. तसेच रविवारी सकाळी १० वाजता श्री प्रभाकर अनुसंधान या पोथीचे सामूहिक अनुष्ठान मीना जोशी यांच्या अधिपत्याखाली होणार आहे. सोमवारी सायंकाळी ६ वाजता ज्ञानेश्वर वाघमारे यांचा भजनसंध्या कार्यक्रम तर रात्री ९ वाजता प्रकाश कोथिंबीरे आणि दत्तात्रय कुसेकर यांच्या अधिपत्याखाली सांप्रदायिक भजन होणार आहे. याचदिवशी रात्री १०.४५ वाजता मंदिरात गुलालाचा कार्यक्रम होईल.

मंगळवारी रोजी दुपारी १२ वाजता हजारो भाविकांना लाडू प्रसादाचे वाटप पोलीस उपयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे त्यांच्या हस्ते होणार आहे. बुधवारी रोजी श्री सद्गुरू प्रभाकर महाराज मंदिरापासून रथ मिरवणूक निघणार आहे. पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) डॉ. दिपाली काळे यांच्या हस्ते प्रारंभी सकाळी ११ वाजता पालखी पूजा करण्यात येणार आहे. मिरवणुकीत भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टी उदय वैद्य यांनी केले. या पत्रकार परिषदे ट्रस्टी दत्तात्रय देशमुख, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य वसंत बंडगर, ट्रस्टी सदस्य वामन वाघचौरे, मोहन बोड्डू, रवी गुंड, सम्राट राऊत, रमेश देशमुख, रामभाऊ कटकधोंड, प्रभाकर कुलकर्णी, सुभाष बद्दूरकर, प्रकाश कोथिंबीरे, व्यवस्थापक निरंजन दंतकाळे आदी उपस्थित होते.



## किर्तीचा मंदिर समितीकडून सत्कार

**अक्कलकोट** : किर्ती भराडिया हिने वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी वरळी सी लिंक ते गेट वे ऑफ इंडिया हे समुद्री ३८ किलोमीटर चे अंतर न थांबता ७ तास २२ मिनिटात पोहून विश्वविक्रम प्रस्थापित केला होता.

त्यानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीतर्फे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी तिचा सन्मान केला. किर्तीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व आशिर्वाद देण्यात आले. याप्रसंगी किर्तीचे वडिल नंदकिशोर, आई चित्रा, भाऊ अविनाश व बहीण श्रेया हे उपस्थित होते. यापुढे श्रीलंका ते रामेश्वर हे ५० किलोमीटर चे अंतर न थांबता पोहण्याचे किर्तीचे पुढील ध्येय आहे.

# नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करू

## आजी-माजी आमदारांचे आश्वासन

**सुराज्य/सांगोला**





लोकांच्या भावना, समस्या, अडचणी व तक्रारी लोकप्रतिनिधी यांच्याबरोबर संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवाव्यात आणि त्या अडचणी सोडवण्यासाठी तात्काळ उपायोजना व्हाव्यात म्हणून अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या समवेत आमदार आपल्या दारी गाव भेट दौरा आयोजित केला आहे.

नागरिकांच्या अडचणी निश्चितपणे सोडवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन आ. शहाजी बापू पाटील आणि दिपक आबा साळुंखे-पाटील या आजी माजी आमदारांनी दिले. आमदार आपल्या दारी या उपक्रमांतर्गत गुरुवारी अकोला गावातील ग्रामस्थांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी गाव भेट दौरा संपन्न झाला. यावेळी आ. शहाजीबापू पाटील व दीपक साळुंखे पाटील बोलत होते. या कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार, शिवसेनेचे नेते उद्योगपती भाऊसाहेब रुपनर यांच्यासह तहसीलदार अभिजीत पाटील, गटविकास अधिकारी आनंद लोकरे, तालुका कृषी अधिकारी शिवाजीराव शिंदे, वीज वितरणचे कार्यकारी अभियंता आनंद पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. बोलताना आ.शहाजी पाटील म्हणाले, सांगोला तालुक्याच्या शेतीच्या पाण्याच्या प्रश्नावर एक टीएमसी पाण्याची वाढ झाली आहे.

त्यामुळे बारमाही पाणी शेतीला मिळणार आहे. यावर पाणी नाही म्हणून नव्हे तर पाण्यामुळे पिके जातील अशी परिस्थिती येत्या काळात निर्माण करू. आ.दिपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, गाव आणि वाड्यावस्त्या वरील विकासाच्या योजना झपाट्याने पूर्ण करून घेण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असल्याचे सांगितले. यावेळी प्रास्ताविक नंदकुमार शिंदे यांनी केले. यावेळी अनिल खटकाळे, योगेश खटकाळे, भागवत शिंदे, गुडा खटकाळे आदी उपस्थित होते.

# सिंहगड किल्ल्यावर सोलापूरच्या विद्यार्थ्यांनी राबविली स्वच्छता मोहीम

**मनपा सुंदराबाई डागा शाळेचा उपक्रम**

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर महापालिका सुंदराबाई डागा शाळेच्या विद्यार्थी व शिक्षकांनी शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबवून किल्ले स्वच्छता व संवर्धनाचा महत्वपूर्ण कृतिशील संदेश दिला. या उपक्रमाच्या राज्यभरातून किल्ला पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांनी कौतुक केले. उत्स्फूर्तपणे या मोहिमेत सहभागही नोंदविला.



सोलापूर महापालिका सुंदराबाई डागा शाळेची शैक्षणिक सहल दि. २ व ३ फेब्रुवारी २०२३ रोजी पुणे दर्शनअंतर्गत पुरंदरचा किल्ला व सिंहगड किल्ला, मोरेश्वर गणपती , जेजुरी, देहू,आळंदी, केटकेवले बालाजी मंदिर या ठिकाणी आयोजित करण्यात आली. या सहलीसाठी इयत्ता पाचवी ते सातवीचे ५५ विद्यार्थी व चार शिक्षक सहभागी झाले होते. या शैक्षणिक सहलीमध्ये सिंहगड किल्ल्याचाही समावेश होता. सिंहगड किल्ल्यावर गेल्यानंतर शाळेतील सहशिक्षक धीरज कुचेकर यांनी विद्यार्थ्यांना किल्ल्याची ऐतिहासिक माहिती दिली. किल्ले दर्शन झाल्यानंतर सिंहगड किल्ल्यावर गर्दीमुळे झालेला केर -कचरा अस्वच्छता पाहून शाळेचे मुख्याध्यापक नागेश गोसावी यांनी विद्यार्थ्यांना सिंहगड किल्ल्याची स्वच्छता करण्याचे आवाहन केले.

सहलीवेळी ऐतिहासिक किल्ल्याची स्वच्छता व संवर्धन ही सर्वांची जबाबदारी असल्याचे मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून सिंहगड किल्ल्याच्या परिसरातील केर -कचरा, प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक कॅरीबॅग, द्रोण, पत्रावळी गोळा करण्यात आले. झाडू मारून स्वच्छताही करण्यात आली. यावेळी हे पाहून इतर जिल्ह्यातून किल्ला पाहण्यासाठी आलेल्या शिक्षकांनी सोलापूरच्या सुंदराबाई डागा शाळेतील विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. तसेच या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग नोंदवला.

### गड-किल्ल्यांचे संवर्धन ही सर्वांची जबाबदारी : गोसावी

सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबवल्यामुळे विद्यार्थी भविष्यात किल्ल्याला भेटी दिल्यानंतर ते किल्ल्यावर केर- कचरा करणार नाहीत. गड - किल्ल्यांचे संवर्धन करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. हे विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा स्वच्छता मोहिमेच्या पाठीमागचा हेतू होता, असे सोलापूर महापालिका सुंदराबाई डागा शाळेचे मुख्याध्यापक नागेश गोसावी यांनी सांगितले.

# पतीच्या हट्टापायी नोकरी सोडून संगीत साधनेचा वसा घेतला

सुराज्य/सोलापूर

**दक्षिण भारतातील विविध भाषांसह मराठीवर अपार प्रेम करणाऱ्या दाक्षिणात्य गायिका वाणी जयराम यांच्या निधनाने सारा मराठी माणूस शोकाकूल झाला. जुन्या काळात त्यांनी गायलेली भक्तीगीते,चित्रपटांमधील गाणी तसेच भावगीते आजही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील रसिकांच्या ओठावर आहेत. एक बँकर ते ख्यातनाम गायिका असा त्यांचा जीवनप्रवास विलक्षण आहे.बँकेच्या सेवेतच त्या रमायच्या पण पतीच्या आग्रहाखातर त्यांनी गायनाची सेवा सुरू केली. या गायकीने त्यांना सर्वोच्च शिखरावर नेले.**



७८ वर्षांच्या वाणी जयराम यांनी कन्नड, तमिळ, हिंदी, तेलुगु, मल्याळम, मराठीसह १९ भारतीय भाषांमध्ये १० हजारांहून अधिक गाणी गायली. त्यात ३३९ गाणी १०० सिनेमांतील आहेत.वाणी यांचा पहिला हिंदी सिनेमा 'गुड्डी' हा होता. त्या सिनेमातील 'हमको मन की शक्ति देना' हे प्रसिद्ध गाणे त्यांनी गायले. हे गाणे आजही अनेक शाळांमध्ये प्रार्थनागीत म्हणून म्हटले जाते. त्यांना तीनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्याचे खरे नाव कलैवनी. वाणी यांनी आठव्या वर्षापासून ऑल इंडिया रेडिओसाठी गाणे गायला सुरुवात केली. त्यानंतर वाणी अनेक वर्षे भारतीय स्टेट बँकेत काम करत होत्या. तमिळनाडूमधील वेल्लोर येथे ३० नोव्हेंबर १९४५ मध्ये वाणी यांचा जन्म झाला. त्यांना सहा बहिणी आणि तीन भाऊ होते. त्यांचे आई-वडील दुरईसामी अय्यंगार आणि पद्मावती संगीतविश्वात कार्यरत होते. वाणी यांच्या पालकांनी रंगा रामुनाजा अय्यंगार शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतलेले. वाणी यांनीही लहानपणापासून शास्त्रीय संगीतचे शिक्षण घेतले होते. वाणी जयराम यांनी ठुमरी, गजल, भजन सारखे गाण्याचे विविध प्रकार गायले. १९६९ मध्ये त्यांनी मुंबईतील एका सार्वजनिक संगीत कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. त्यावेळी त्यांची भेट संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली. त्यावेळी ते कुमार गंधर्व यांच्याबरोबर एक मराठी अल्बम रेकॉर्ड करत होते. वाणी यांचा आवाज ऐकल्यानंतर वसंत देसाई यांनी कुमार गंधर्व यांच्याबरोबरच्या अल्बममध्ये 'ऋणानुबंधाच्या' गाण्यासाठी वाणी यांना संधी दिली. हे गाणं आणि तो अल्बम मराठीमध्ये खूप गाजला.म्हणून गायलं जातं. वाणी यांनी वसंत देसाई यांच्याबरोबर महाराष्ट्राचा दौरा केला आणि अनेक शाळांमध्ये जाऊन मुलांना या गाण्याबरोबरच अनेक गाणी शिकवली.

वाणी जयराम यांनी १०० हिंदी सिनेमांसाठी ३९९ गाणी गायली. त्यात १९७२ मध्ये प्रदर्शित झालेल्या पाकिजा सिनेमातील मोरे साजन सौतन घर हे गाणे गायले. तर आइना सिनेमासाठी आशा भोसले यांच्याबरोबर दुल्हन बडी जादूगरनी हे गाणे गायले होते. वाणी यांनी मदन मोहन यांचे प्यार कभी कम नहीं करना हे लोकप्रिय गाणे गायले होते. हे गाणे त्यांनी किशोर कुमार यांच्यासाथींत गायले होते. त्याचबरोबर वाणी यांनी गायलेलं मेरे तो गिरधर गोपाल हे भजन देखील लोकप्रिय झाले होते. वाणींने आरडी बर्मन, श्यामजी घनश्यामजी, कल्याणजी आनंदजी, मन्ना डे, जयदेव आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल यांसारख्या प्रसिद्ध संगीतकारांबरोबर काम केले होते.जन्मभूमी तमिळनाडूची असली तरी गायकीने त्यांची मुंबई ही कर्मभूमी ठरली. त्यामुळे त्यांच्याविषयी मराठी रसिकांमध्ये विशेष अप्रूप असायचे.

### स्टेट बँकेत नोकरी

आठ वर्षांच्या होत्या तेव्हापासून त्या मद्रास इथल्या ऑल इंडिया रेडिओवर गाणी गायच्या. मद्रास युनिव्हर्सिटीमधील क्वीन मेरी कॉलेजमधून त्यांनी शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर वाणी जयराम अनेक वर्षे भारतीय स्टेट बँकेमध्ये नोकरी केली. त्यासाठी त्या चेन्नई आणि नंतर हैदराबाद येथे होत्या.त्यांचे लग्न संगीताची आवड असलेल्या कुटुंबात झाले. त्यांची सासू पद्मा स्वामीनाथन प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या होत्या तसेच कर्नाटक संगीतामधील गायिका होत्या. १९६९ मध्ये वाणी यांनी जयराम यांच्याशी लग्न झाले. लग्नानंतर वाणी त्यांच्या नवऱ्याबरोबर मुंबईला आल्या. तेव्हा देखील त्या बँकेत काम करत होत्या. परंतु त्यांचे पती जयराम जेव्हा वाणी यांची गाणी ऐकायचे तेव्हा आपल्या बायकोने गाण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण घ्यावे असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांनी वाणी यांना हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेण्यासाठी तयार केले. त्यानंतर वाणी पटियाला घराण्याचे उस्ताद अब्दुल रहमान खान यांच्याकडून शिक्षण घ्यायला सुरुवात केली. संगीतामध्ये वाणी यांचा रस वाढल्यानंतर त्यांनी बँकेतील नोकरी सोडली आणि पूर्णवेळ व्यावसायिक गायिका म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला.



## कुर्डूवाडी नगरपालिका शाळेत भरला आनंद बाजार

**सुराज्य/कुर्डूवाडी** : कुर्डूवाडी नगरपालिका संचलित नगरपालिका शाळा क्रमांक एक दोन व चार मध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच बाहेरील व्यवहाराचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा यासाठी आनंद बाजार भरवण्यात आाल. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोनाली गवळी, मुख्याध्यापक नागनाथ उबाळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांकडून भाजी फळे खरेदी केली. या आनंद बाजाराला ग्रामस्थ ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यात तब्बल २८ हजारांची उलाढाल झाली. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी शेतातील विविध सेंद्रिय खतांचा वापर करून पिकविलेल्या खाद्यपदार्थ, विक्रीसाठी आणले होते. खरेदीसाठी पालक व ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील मुख्याध्यापक एन. एस उबाळे, ए.बी कदम, आर. एस. नेटके, आर. पी. मिरगणे, पंडित के. सी. ए. डी. बागल, अरूणा कारंडे, एम. आर. मिरगणे, एम. डी. शिंदे, एम. डी. कदम, मजिदा दारुवाले, व्ही. आर. बोराडे, मराळ पंकज यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## सांगोला तालुक्यात युवक संघटना नामफलकाचे उद्घाटन

**सुराज्य/सांगोला** : शेकाप व पुरोगामी युवक संघटना सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने बुरुंगेवाडी, भोपसेवाडी, आगलावेवाडी, तरंगेवाडी व जवळा येथे पुरोगामी युवक संघटना नामफलकाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आम. भाई संपतराव पवार - पाटील उपस्थित होते. उद्घाटक म्हणून पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख उपस्थित होते. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते बाबा कारंडे, माजी सभापती बाळासाहेब काटकर, माजी उपसभापती संतोष देवकते, आनंदा यमगर, मायप्पा यमगर, डॉ. किसन माने, विनायक कुलकर्णी, मधुकर गोरड, शेकापचे चिटणीस दादाशेठ बाबर, समाधान काशीद, राजू गावडे, श्रीपती वगरे, महेश बंडगर यांच्यासह शेकापची अनेक ज्येष्ठ नेते मंडळी यावेळी उपस्थित होते. बाबा कारंडे पुढे यांनी सध्या तालुका मागे फेकला जात आहे. येत्या निवडणुकित जनताच योग्य भूमिका घेईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन केले. यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले की, 'भाई गणपतराव देशमुख यांच्या विचारानुसार आम्ही काम करत आहोत. देशमुख कुटुंबीयांमध्ये एकी आहे. जनता आणि पक्ष ठरवेल तो विधानसभेचा उमेदवार असेल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शेतकरी कामगार पक्ष स्वतंत्रपणे लढवेल, असे सांगितले.'

## महिलेस मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर** : कुत्र्यास दगड का मारली? याचा जाब विचारल्याच्या कारणावरून दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत ४० वर्षीय महिला जखमी झाली. ही घटना सोनलवाडी (ता.सांगोला) येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली दोघा महिलासह चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

यशोदा उत्तम कारंडे (वय ४० रा. सोनलवाडी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संगीता बुरुंगले, तिचे पती कमलसिद्ध बुरुंगले, भाऊ बुरुंगले आणि वैशाली बुरुंगले या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. फिर्यादी यशोदा कारंडे यांच्या घरासमोरील कुत्र्यास संगीता बोरंगले हिने दगड मारली होती. त्याचा जाब विचारले असता वरील चौघांनी मिळून त्यांना काठी आणि दगडाने मारहाण केली.अशी नोंद पोलिसात झाली हवालदार फारम शेट्टी पुढील तपास करीत आहेत.

### ३ लाखांचा ऊस जळाला

सोलापूर-निष्काळजी पणाने उसाच्या पाचट पेटविल्याने आग पसरत जाऊन तिघांच्या शेतातील ऊस आणि इतर साहित्य जळून २ लाख ८० हजाराचे नुकसान झाले. ही घटना बोरगाव (ता. माळशिरस) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी अरुण सुभाष भोसले(रा.बोरगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात शिवाजी मोहन भोसले (रा. बोरगाव) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्या गट क्रमांक ५३४ येथील शेताजवळ राहणारे अरुण भोसले याने त्याच्या शेतातील उसाच्या पाचटाला काल दुपारी आग लागली होती. आग पसरत गेल्याने रवींद्र रेडे यांच्या शेतातील ठिंबक ड्रिप आणि पीव्हीसी पाईप जळाला. भोसले यांच्या शेतातील अडीच एकर ऊस आणि ड्रीपचे साहित्य जळाले.

## माढा तालुका काँग्रेसचे 'हाथसे हाथ जोडो अभियान'

सुराज्य/माढा

**माढा तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने 'हाथसे हाथ जोडो अभियाना'चा शुभारंभ ज्येष्ठ नेते व माजी आमदार धनाजीराव साठे यांच्या हस्ते करण्यात आला.**



यावेळी माजी आमदार धनाजीराव साठे यांनी काँग्रेस पक्षाचे कार्य तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवून पक्ष बळकट करण्याचे आवाहन केले. सद्यस्थितीत देशाला काँगेसचीच गरज असल्याचे सांगितले. यावेळी कारखान्याचे संचालक व सोलापूर (ग्रामीण) जिल्हा युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष दादासाहेब साठे यांची प्रमुख उपस्थिती होती. तालुकाध्यक्ष सौदागरदादा जाधव यांच्या नियोजनाखाली अभियानाची सुरुवात झाली. प्रास्ताविक सोशल मीडिया विभागाचे जिल्हाध्यक्ष सचिन खैरे-पाटील यांनी केले. त्यानंतर शहराध्यक्ष सोमनाथ कदम यांनी रूपरेषा मांडली. सौदागर साठे यांनी अभियानाचा उद्देश सांगितला.

बैठकीसाठी काँग्रेस सेवादलाचे जिल्हा उपाध्यक्ष अशोक पाटील, व्हीजेएनटी विभागाचे प्रदेश सरचिटणीस भिमराव बंडगर, कुर्डूवाडी शहराध्यक्ष फिरोज खान, कुर्डूवाडी शहर अल्पसंख्यांक शहराध्यक्ष हमीद शिकलकर, सभापती नितीन साठे, अरूण कदम, विकास साठे, नगरसेवक सुधीर लंकेश्वर, रमेश थोरात, बाबूराव नेटके, मुन्ना बागवान, कुर्डूवाडी बाजार समितीचे माजी संचालक संतोष पाटील, सेवादलाचे तालुकाध्यक्ष प्रा. रमेश रणदिवे आणि, पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सरचिटणीस नारायण गायकवाड यांनी आभार मानले.

## गुलमोहर सोसायटीत घरफोडी

**सुराज्य/सोलापूर:** सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावरील शिवाजी नगरातील गुलमोहर सोसायटीत जबरी घरफोडी होऊन अज्ञात चोरट्याने शाळेत शिपाई असलेल्या महिलेच्या घरातील जवळपास ५ लाख १५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे आणि चांदीचे दागिने चोरून नेले. या घटनेची हाकिकत आशी की,चंडक हायस्कूलमध्ये शिपाई म्हणून कार्यरत असलेल्या ज्योती दीपक वसेकर (वय-३८,रा.गुलमोहर सोसायटी,शिवाजीनगर,बाळे) याआपल्या घराला कुलूप लावून कामाला गेल्या होत्या. अज्ञात चोरट्याने संधी साधत दुपारी १ ते ४ या वेळेत घराच्या लोखंडी दरवाजाचे कुलूप तोडून,बेडच्या आत ठेवलेल्या बॅगेतील डब्यात ठेवलेल्या सोन्या चांदीचे पाच लाख १५ हजार रुपये किमतीची दागिने चोरून नेले.यात सोन्याचे गंठण,सोन्याचे लॉकेट,बदाम असलेले लॉकेट, लेडीज अंगठी,कानातील झुमके,टॉप्स,तसेच चांदीचे पैंजण असा ऐवज होता.फिर्यादी या आपल्या दोन मुलीसह घरी राहतात. कामाला गेल्यानंतर ही चोरी झाली.याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून,अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दांडगे हे करत आहेत.




## तरुणाचा मोबाईल पळवला

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने तरुणाचा मोबाईल चोरून नेल्याची घटना नार्थकोट शाळेच्या शेजारी सिध्देश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दि.२० डिसेंबर २०२२ रोजी घडली. याप्रकरणी राजेश श्रीशैल व्हनमाने (वय-२६,रा. मु.पो.विंचूर,ता.दक्षिण सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी हे वरील ठिकाणी असताना त्यांच्या पॅन्टच्या खिशात ठेवलेला मोबाईल अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेला आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

## शहरात दुचाकी चोरण्याचे प्रमाण वाढले

सुराज्य/सोलापूर

शहरात अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या मोटारसायकल चोरीच्या घटना थांबण्याचे नाव घेईनात. रोज दोन ते चार मोटारसायकली चोरीला जात आहेत. याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होताना दिसत आहेत. गेल्या एक-दोन दिवसात ४ मोटारसायकलीच्या विविध घटना पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्या आहेत.

### डुप्लिकेट चावीचा वापर करून दुचाकी पळवली

अज्ञात चोरट्याने डुप्लिकेट चावीचा वापर करून दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डि. एल.६७४७ ही चोरून नेली आहे. ही घटना दि. ३० जानेवारी रोजी राणा ग्रुपच्या पार्किंग मध्ये घडली. याप्रकरणी राम राजू चव्हाण (वय-२३, रा. समाधान नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आटुळे हे करीत आहे.

### राहत्या घरासमोरून दुचाकी लंपास

घरासमोर हँडल लॉक करून पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीटी.५७७४ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि.२८ जानेवारी रोजी न्यू पाच्छा पेठ, शंकर सदर बिल्डिंगसमोर, अशोक चौक सोलापूर येथे घडली. याप्रकरणी अशोक रामलू फुलपाटी (वय-४६, न्यु पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गंगावणे हे करीत आहे.



### दुचाकी पळवली

हँडललॉक करून पार्क केलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीडब्लू.२८४९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि. २६ ते २९ जानेवारी दरम्यान बिराजदार हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये घडली. याप्रकरणी समाधान बाळासाहेब संभेराव (वय-२, रा. लोभा मास्तर चाळ, बिराजदार हॉस्पिटलच्या बोळात, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहे.

## ई-पीक पाहणी नोंदीत अक्कलकोट जिल्ह्यात अव्वल

सुराज्य/अक्कलकोट



रब्बी हंगाम ई-पीक पाहणी नोंदीत अक्कलकोट तालुका सोलापूर जिल्ह्यात अव्वल ठरला आहे. तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्या प्रभावी कामगिरीमुळे गावोगावी या कामाला मोठी गती प्राप्त झाली आहे. लवकरच या नोंदी १०० टक्के होणार असल्याची माहिती तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी दिली आहे. अक्कलकोट तालुक्यातील सर्व गावांमध्ये याबद्दल कोतवाल, तलाठी आणि पोलीस पाटील यांच्यामार्फत जनजागृती करण्यात येत आहे तसेच स्वतः शेतकरी देखील ॲपच्या माध्यमातून लोकेशन टाकून याची नोंद करू शकतात. ३१ जानेवारी यासाठी अंतिम मुदत होती परंतु प्रशासनाने याची मुदत आता १५ फेब्रुवारी केली आहे. अक्कलकोट तालुक्यात रब्बीचे पेरणी क्षेत्र हे ६४ हजार हेक्टर आहे त्यापैकी ४६ हजार हे. पीक पाण्याची नोंद झाली आहे साधारण ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे उर्वरित क्षेत्रावर ही याची नोंदणी सुरू आहे तरीही अक्कलकोट तालुका अव्वल ठरला आहे. १५ फेब्रुवारीनंतर शेतकऱ्यांना चालू वर्षाच्या रब्बी हंगामाची पिक पाणी नोंद करता येणार नाही.त्यामुळे त्यामुळे शेतकऱ्यांनी तात्काळ या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिरसट यांनी केले आहे.



रविदास महाराजांची जयंती उत्साहात साजरी

## जॉन फुलारेंकडून पाच लाखांची मूर्ती मंडळास भेट

**सोलापूर** : संत रविदास महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जॉन फुलारे तसेच माजी नगरसेविका श्रींदेवी फुलारे यांच्या वतीने पाच लाख रुपयांची अकरा फूटी मूर्ती मध्यवर्ती महामंडळास भेट देण्यात आली.

अनिष्ठ प्रथा आणि रूढीला विरोध करणारे संत रोहिदास महाराज यांची जयंती उत्साहात आणि विविध उपक्रमाने साजरी करण्यात येत आहे. सोलापुरात हुतात्मा चौक येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघ प्रणित संत रोहिदास मध्यवर्ती जयंती उत्सव महामंडळाच्या वतीने संत रविदास महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना व पूजन पालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते अमोल शिंदे, मनपा अधिकारी संजय धनशेट्टी, मध्यवर्ती महामंडळाच्या अध्यक्षा श्रींदेवी फुलारे, अशोक लांबतुरे, संजय शिंदे, सामाजिक कार्यकर्ते जॉन फुलारे, सुरेखा लांबतुरे,मधुकर गवळी आदींच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. उत्सव अध्यक्षा श्रीदेवी फुलारे आणि जॉन फुलारे यांच्या वतीने राष्ट्रीय चर्मकार महासंघ प्रणित संत रविदास मध्यवर्ती उत्सव मंडळास महाराजांची पाच लाख रुपयांची ११ फूटी मूर्ती भेट स्वरूपात देण्यात आली. सोलापुरात प्रथमच अशा भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आल्याने समाज बांधवामध्ये मोठा आनंद व्यक्त करण्यात आला. प्रतिष्ठापने निमित्त मान्यवारांनी जयंती उत्सवाच्या शुभेच्छा देताना संत रोहिदास महाराजांच्या कार्यकर्तृत्वला उजाळा दिला फटाक्यांची आतषबाजी यावेळी करण्यात आली. या प्रसंगी राम कबाडे, गणेश तुपसमुद्रे, परशुराम मब्रुखाने, अजय राऊत,पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ उपकुलसचिव मलिक रोकडे, रवीं प्रशांत कांबळे, आदी उपस्थित होते.

# मातोश्री ग्रामसमृध्दी योजनेंतर्गत पाणंद रस्त्यासाठी ८ कोटी मंजूर


### आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची माहिती

सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील एकूण ३५ विविध पाणंद रस्ते होऊन ३५ किलोमीटर रस्ता होणार आहे. यामुळे शेतकरी बांधवांची पावसाळ्यात होणारी दळणवळणाची गैरसोय दूर करण्यासाठी प्रति किलोमीटर २३ लाख ९८ हजार रुपये प्रमाणे ३५ किलोमीटर करिता ८ कोटी ३८ लाख ३० हजार रुपये मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.**

शिवाराकडे जाणारी पाणंद रस्ते अत्यंतखराबअसल्यानेशेतकऱ्यांचेप्रचंड गैरसोय होत होती. तसेच शेतकऱ्यांचे शेतातील ऊस कारखान्याला पाठविणे अथवा शेतकऱ्यांचे गहू, ज्वारी, तांदूळ, हरभरा, तुर आदी नगदी पीके बाजारपेठेत आणणे शेतकऱ्यांना अत्यंत जिकिरीचे होते.

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक शेतकरी आणि सर्व गावकरी समृध्द व्हावेत या दृष्टीकोनातून 'मी समृध्द तर गाव समृध्द' आणि 'गाव समृध्द तर माझा महाराष्ट्र समृध्द' ही संकल्पना मनरेगा व राज्य रोहयोच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. शेत शिवारातील पाणंद रस्ते हे प्रामुख्याने शेतीमधील कामाकरीता आवश्यक असणाऱ्या साधनांची ने-आण करण्याकरीता उपयोगात येतात. यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे यंत्रामार्फत करण्यात येतात. या यंत्रसामुग्रीची वाहतूक करण्याकरीता, बारमाही वापराकरीता शेत शिवारातील पाणंद रस्ते सुयोग्य असणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रमाणित दर्जाचे शेत पाणंद रस्ते तयार करण्याकरिता मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद रस्ते योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली होती त्या योजनेतून ही अकरा कामे मार्गी लागली आहेत.यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून एकूण ३५ पाणंद रस्त्याना मंजुरी मिळाली आहे त्याने शेतकरी बांधवाचे कष्ट कमी होण्यास मदत होणार आहे.मंजूर पाणंद रस्ते पुढीलप्रमाणे आहेत.



### या रस्त्यांचा समावेश

हन्नूर- ४ कि. मी., करजगी- ४ कि. मी., सलगर- १ कि. मी., पितापूर- २ कि. मी बोरी उमरगे-१ कि.मी., जेऊरवाडी-१. कि.मी., संगदरी- ३ कि.मी., तडवळ-१ कि.मी., अंकलगे- १ कि.मी., दर्शनाळ- १ कि.मी., गोगाव-१ कि.मी., रुद्देवाडी-१ कि.मी., सिन्नूर- १ कि.मी., किणी-१ कि.मी., धारसंग-१ कि.मी., आंदेवाडी ज.-१ कि.मी., चिकेहळळी-१ कि.मी., गळोरगी-१ कि.मी., कंटेहळळी-१ कि.मी., हसापूर-१ कि.मी., काझीकणबस-१ कि.मी., जकापूर-१ कि.मी., रामपूर-१ कि.मी., दहिटणेवाडी-१ कि.मी., बागेहळळी-१ कि.मी., वागदरी-१ कि.मी. आदी २६ गावांसाठी ३५ कि.मी पाणंद रस्त्यांचा समावेश आहे.

# प्रख्यात गायिका वाणी जयराम यांचे निधन



## वयाच्या ७८ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

सुराज्य/मुंबई

राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या दिग्गज पार्श्वगायिका वाणी जयराम यांचे निधन झाले. संगीतविश्वाला धक्का देणारी ही बातमी अवघ्या काही तासांपूर्वीच समोर आली आहे.

वाणी जयराम यांना यावर्षी अलिकडेच 'पद्मभूषण' या भारतातील तिसऱ्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. चेन्नईतील नुंगमबक्कम येथील हॅडोस रोडवरील त्यांच्या घरी या प्रसिद्ध गायिकेने अखेरचाा श्वास घेतला. त्या ७८ वर्षांच्या होत्या. रिपोर्टनुसार त्यांच्या कपाळावर जखम झाली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चेन्नई याठिकाणी असणाऱ्या राहत्या घरी त्यांचा मृतदेह आढळून आला. थाउजंड्स लाइट्स पोलीस अधिकाऱ्यांनी याविषयी माहिती दिली. ही घटना नेमकी कशी घडली याविषयीची सविस्तर माहिती आणि मृत्यूचे कारण अद्याप समोर आलेले नाही.

वाणी जयराम यांनी संगीत विश्वातील मोठ्या संगीतकारांसोबत काम कले असून त्यांनी सदाबहार गाणी दिली. त्यांनी तामिळ, तेलुगु, कन्नड, मल्याळम, हिंदी, उर्दू, मराठी, बंगाली, भोजपुरी, तुलू आणि ओरिया असा विविध भाषांमधील गाणी गायली आहेत. वाणी जयराम यांनी देशात आणि जगभरात परफॉर्म करत भारतीय संगीताचे नाव मोठे केले. उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांना तीन वेळा सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका या श्रेणीमध्ये राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला आहे. वाणी जयराम यांना तामिळनाडू, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, केरळ, गुजरात आणि ओडिशा या राज्यांकडून राज्य पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले.

वाणी जयराम यांनी अलिकडेच एक व्यावसायिक गायिका म्हणून संगीत विश्वामध्ये ५० वर्षे पूर्ण केली. त्यांनी या कारकिर्दीत १०,००० हून अधिक गाणी रेकॉर्ड केली आहेत. एम.एस. इलैयाराजा, आर.डी. बर्मन, के.व्ही. महादेवन, ओ. पी. नय्यर आणि मदन मोहन या दिग्गज संगीतकारांसह काम केले आहे.

## जलद प्रवासासाठी अर्थबळ

# यंदाच्या अर्थसंकल्पात बुलेट ट्रेनसाठी १९,५९२ कोटींची तरतूद

सुराज्य/नवी दिल्ली

**देशातील पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम महाराष्ट्रात पूर्ण वेगाने सुरू झाल्याने यंदाच्या अर्थसंकल्पात यासाठी तब्बल १९,५९२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई-दिल्ली रेल्वेरुळांची १६० किमी प्रतितास या वेगाकरीता दर्जावृद्धीसाठी १ हजार ३४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.**

महाराष्ट्रात उद्धव ठाकरे मुख्यमंत्रिपदी असताना बुलेट ट्रेनची परवानगी रखडली होती. या प्रकल्पात अनेक अडथळे होते. सत्ता बदलानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुलेट ट्रेन प्रकल्पाला प्राधान्य देत सर्व परवानग्या दिल्या. गुजरातमध्ये १४० किमी अंतराचे बुलेट ट्रेनचे खांब उभे करण्यात आले आहेत. गुजरातप्रमाणे महाराष्ट्रातही वेगाने बुलेट ट्रेनचे काम सुरू करण्यात येईल, असे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांच्या अर्थसंकल्पीय निधींबाबत ते बोलत होते.



महाराष्ट्रातील भूसंपादन रखडल्याने गुजरातमधील बुलेट ट्रेनचे काम वेगाने पूर्ण करण्यात आले. गेल्या अर्थसंकल्पात बुलेट ट्रेनसाठी पाच हजार कोटींची तरतूद करण्यात आली होती. बुलेट ट्रेनसाठी ऑगस्ट २०२६ कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाचे एकूण भूसंपादन ९८.८८ टक्के झाले आहे. राज्यातील जमीन अधिग्रहणाचा टक्का ९८.७९ आहे. राज्यातील मुंबई उपनगर आणि पालघर जिल्ह्यातील भूसंपादन पूर्ण झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील १३६.८५ हेक्टरपैकी १३१.९६ हेक्टर जागेचे संपादन पूर्ण झाले आहे.

# ...ही काश्मिरी पंडितांसोबतची क्रूरता

## राहुल गांधी यांचा मोदी सरकारवर हल्लाबोल

सुराज्य/नवी दिल्ली

काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी काश्मिरी पंडितांना होणारा त्रास, त्यांची दुःखं मांडली आहेत. 'भारत जोडो यात्रे'दरम्यान राहुल यांनी काश्मिरी पंडितांच्या एका प्रतिनिधी मंडळाची भेट घेतली होती. या प्रतिनिधींनी राहुल यांच्यासमोर आपली वेदना मांडली. मोदी सरकारला लक्ष्य करत राहुल यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे की, 'दहशतवाद्यांच्या निशाण्यावर असलेल्या काश्मिरी पंडितांना कोणत्याही सुरक्षेशिवाय खोऱ्यात जायला भाग पाडणं ही क्रूरता आहे. हे मोदी सरकारचं निर्दयी पाऊल आहे.'



राहुल यांनी मोदींना लिहिलेलं पत्र हिंदी भाषेत आहे. त्यांनी हे पत्र मायक्रोब्लॉगिंग साईट ट्विटरवर शेअर केलं आहे. त्यात राहुल यांनी लिहिलं आहे की, 'पंतप्रधान महोदय, भारत जोडो यात्रेदरम्यान काश्मिरी पंडितांचं एक प्रतिनिधी मंडळ मला भेटायला आलं होतं. तेव्हा त्यांनी त्यांची दुःखद परिस्थिती मला सांगितली. दहशतवाद्यांच्या रडारवर असलेल्या काश्मिरी पंडितांना कोणत्याही सुरक्षेशिवाय खोऱ्यात जाण्यास भाग पाडणं हे क्रूर पाऊल आहे. तुम्ही या प्रकरणी योग्य ती पावले उचलाल अशी आशा आहे.'

## चिटफंड प्रकरण

# चिदंबरमसह तिघांची मालमत्ता 'ईडी'कडून जप्त

सुराज्य/नवी दिल्ली

**शारदा चिटफंड घोटाळाप्रकरणी माजी केंद्रीय अर्थमंत्री व ज्येष्ठ काँग्रेस नेते पी. चिदंबरम् यांच्या पत्नी नलिनी चिदंबरम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार देवेंद्रनाथ बिस्वास व आसामचे माजी मंत्री दिवंगत अंजन दत्ता यांच्या संयुक्त मालकीच्या एका कंपनीची सहा कोटींची मालमत्ता जप्त केली, अशी माहिती सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी दिली.**



'ईडी'ने निवेदनात नमूद केले, की आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) तीन कोटी ३० लाख रुपयांची जंगम मालमत्ता आणि तीन कोटींची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा तात्पुरता आदेश देण्यात आला आहे. या मालमत्ता शारदा समूहासह इतरांच्या मालकीच्या होत्या.

या समूहाद्वारे करण्यात आलेल्या आर्थिक गुन्ह्यातील उत्पन्नाच्या लाभार्थीत नलिनी चिदंबरम, पश्चिम बंगाल क्लबचे अधिकारी देवब्रत सरकार, देवेंद्रनाथ बिस्वास, माजी आयपीएस' अधिकारी व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार देबेंद्रनाथ बिस्वास आणि आसामचे माजी मंत्री व माजी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अंजन दत्ता यांच्या मालकीच्या अनुभूती 'प्रिंट्र्‌ अँड पब्लिकेशन्स'चा सहभाग होता.

शारदा समूहाने २०१३ पर्यंत पश्चिम बंगाल, आसाम आणि उडिशात केलेल्या कथित 'चिटफंड' घोटाळ्याशी संबंधित हा आर्थिक गैरव्यवहार आहे. या समूहाने उभारलेली एकूण रक्कम सुमारे दोन हजार ४५९ कोटी आहे.

ज्या पैकी ठेवीदारांवर व्याजाची रक्कम वगळून आतापर्यंत सुमारे एक हजार ९८३ कोटी रुपये देणे बाकी असल्याचे 'ईडी'ने सांगितले. 'ईडी'ने या प्रकरणी आतापर्यंत सुमारे ६०० कोटींची मालमत्ता जप्त केली आहे.

# व्होडाफोन, आयडिया कात टाकणार

## भारत सरकार बनणार ३३ टक्के भागीदार

सुराज्य/नवी दिल्ली

भारत सरकारने व्होडाफोन आयडियाच्या १६ हजार कोटी रुपयांच्या व्याज देय रकमेचे शेअर्समध्ये रूपांतर करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे भारत सरकार आता व्होडाफोन-आयडियामध्ये ३३ टक्के भागीदार होणार आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली.




एका राष्ट्रीय दैनिकाने दिलेल्या वृत्तानुसार, मागील काही वर्षांपासून व्होडाफोन-आयडिया कंपनीवर कर्जाचा डोंगर आहे. त्यामुळे या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी केंद्र सरकारकडून व्होडाफोन-आयडियाला स्पेक्ट्रमच्या थकीत व्याजाचे शेअर्समध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. हा प्रस्ताव व्होडाफोन-आयडियाकडून मान्य करण्यात आला आहे. त्यामुळे केंद्र सरकारला व्होडाफोन-आयडिया कंपनीत ३३ टक्के भागीदारी मिळाली आहे. महत्त्वाचे म्हणजे कंपनीच्या या निर्णयानंतर व्होडाफोन-आयडियाची भागीदारी ५० टक्क्यांनी कमी होणार आहे.

दरम्यान, शुक्रवारी झालेल्या या निर्णयानंतर व्होडाफोन आयडिया शेअर्सच्या किमतीत १ टक्क्यांनी वाढ झाली होती. विशेष म्हणजे गेल्या महिन्यात व्याजाच्या रक्कमेच्या ऐवजी सरकार शेअर्स स्वीकारणार असल्याची माहिती पुढे आल्यानंतर व्होडाफोन-आयडियाच्या शेअर्समध्ये घसरण झाल्याचे बघायला मिळालं होतं.

# महाराष्ट्रातील राजकारण दारूच्या पैशांवर चालते

## डॉ. अभय बंग यांचा गंभीर आरोप

सुराज्य/मुंबई

**महाराष्ट्रातील राजकारण दारूच्या पैशांवर चालते. दारूच्याच पैशांनी निवडणुका जिंकल्या जातात, असा गंभीर आरोप सर्च या संस्थेचे प्रमुख आणि प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी केला.**



वर्धा येथे आयोजित ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ते बोलत होते. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी डॉ. बंग यांची प्रकट मुलाखत पार पडली. या मुलाखतीत डॉ. बंग म्हणाले, 'दारूने देशाचे मोठे नुकसान केले आहे. महाराष्ट्र तर मद्यराष्ट्र झाले आहे. दरवर्षी आपल्या राज्यात २ लक्ष कोटींची दारू पिली जाते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

**दारू पिणाऱ्यांना अंनिसच्या ताब्यात द्या**

दारू पिणाऱ्यांना अंनिसच्या ताब्यात द्या, कारण ते दारू आरोग्याच्या हिताची आहे, असे सांगून अंधश्रद्धा पसरवताहेत, असा खोचक सल्लाही डॉ. बंग यांनी सरकारला दिला.

# पुणे रेल्वे विभागासाठी अर्थसंकल्पात १३०० कोटींची तरतूद

सुराज्य/पुणे

पुणे रेल्वे विभागाला अर्थसंकल्पामध्ये १३०० कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यामध्ये पुणे रेल्वे स्थानकाच्या यार्ड रिमॉडेलिंग, घोरपडी येथे 'वंदे भारत एक्सप्रेस' पीट लाईन, पुणे मिरज लोंढा मार्गाचे दुहेरीकरण या कामांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. रेल्वेच्या कामांना मोठ्या प्रमाणात निधी मिळाल्यामुळे पुणे विभागातील प्रकल्पांना गती मिळणार आहे.

# देशी दारूच्या फवारणीने पीक झाले झिंगाट

सुराज्य/भंडारा

दारू अनेकांचा संसार उद्ध्वस्त करते. मात्र, दारूचा चांगला उपयोगदेखील होऊ शकतो, असे म्हणायला आता हरकत नाही. लाखनी तालुक्यातील जेवणाळा येथील एका पठ्ठ्याने याच देशी दारूचा प्रयोग कीडनाशक म्हणून केला आहे. 'धान पिकाच्या नर्सरीवर चक्क देशी दारूची फवारणी करून दारू नही दवा है' म्हणत नर्सरीतील रोपांना रोगमुक्त करण्याचा प्रयोग रामदास गोंदोळे या तरुण शेतकऱ्याने यशस्वीरित्या केला. त्यामुळे आता दारूचा असाही प्रयोग करून पाहण्यास हरकत नाही, अशी प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून उमटत आहे.

लाखनी परिसरात सध्या उन्हाळी धान रोवणीसाठी नर्सरीची तयारी सुरू आहे.



वातावरणातील वाढती उष्णता आणि धुके पडण्याचे प्रमाण वाढल्याने धानाचे पऱ्हे पिवळे पडून कीडग्रस्त होत आहेत. अशावेळी शेतकरी औषधांची फवारणी करत आहेत. मात्र, रामदास गोंदोळे यांनी नर्सरीतील रोपांवर चक्क देशी दारूची फवारणी केली. काही दिवसांतच नर्सरीतील रोपे रोगमुक्त झाल्याचे ते सांगतात.

उमेश गोंदोळे यांनी एक पंप फवारणीसाठी ९० मिली. देशी दारू व सोबत एक पाव युरिया एकत्र करून त्याची फवारणी केल्याने रोपे टवटवीत झाली. त्यामुळे पिकाची चांगली वाढ होऊन ते लवकरच रोवणी योग्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

कृषीसाठी हा प्रयोग नवा नाही. कोणत्याही कृषी विद्यापीठाने पिकांवर मद्यप्रयोगाला अधिकृत परवानगी दिलेली नाही. पण, पिकांवर मद्यप्रयोग परिणामकारक असल्याचे शास्त्रज्ञ सांगतात. आता इतर शेतकरीसुद्धा हा देशी जुगाड वापरत आहेत.

**अन् रोपे हिरवीगार, रोवणीयोग्य झाली**

थंडी वाढल्यामुळे धानाच्या नर्सरीतील रोपे पिवळी पडून त्यांची वाढ खुंटली होती. यासाठी इतर औषधांची फवारणी केली. मात्र, सुधारणा झाली नाही. त्यामुळे देशी दारू व युरिया खताची फवारणी करून पाहिली. काही दिवसांतच नर्सरी हिरवीगार होऊन रोपे रोवणी योग्य झाले आहेत, असे रामदास गोंदोळे यांनी सांगितले.

# मुलांमध्ये वाढले दृष्टिदोषाचे प्रमाण

## सर्वाधिक प्रमाण शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये

सुराज्य/मुंबई

**कोरोनादरम्यान वाढलेला मोबाइलचा वापर, सातत्याने ऑनलाइन माध्यमातून करावे लागणारे काम यामुळे १० ते ४५ वर्षे या वयोगटात दृष्टीदोषाचे प्रमाण ३० ते ४० टक्क्यांनी वाढले आहे. दृष्टीदोष होण्याचे सर्वाधिक प्रमाण शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये असल्याचे निरीक्षण नेत्ररोग तज्ज्ञांनी नोंदवले आहे. त्यामुळे आगामी काळात पालकांना मुलांच्या डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागणार असल्याचे नेत्ररोग तज्ज्ञांनी सांगितले.**

गेल्या काही वर्षांमध्ये पूर्वीच्या तुलनेत मुलांचे मैदानी खेळण्याची वेळ कमी झाले असून, टीव्ही, व्हिडिओ गेम, आयपॅड स्क्रीनसमोर वेळ घालवणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मुलांना डोळ्याचे आजार होत असल्याचे दिसून येत आहे.

बालरोगतज्ज्ञ आणि निओनॅटोलॉजिस्ट डॉ. वृषाली बिचकर यांनी सांगितले की, लहान मुलांनी अतिप्रमाणात स्क्रिनचा वापर केल्यामुळे मेंदूवर दुष्परिणाम होऊ शकतो. बोलण्यात तोतरेपणा येणे, मानसिक समस्या निर्माण होणे, रात्री चांगली झोप न येणे, संवाद साधताना अडचणी येणे, नैराश्य आणि राग या प्रकारच्या समस्यांचा त्रास होऊ शकतो. लहान मुलांचा स्क्रीन टाइम दररोज एक तासापेक्षा जास्त नसावा. ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर (एएसडी) अधिक हा आजार सामान्य होत चालला असून, अनेक संशोधनानुसार त्याचे जास्त प्रमाणात निदान होत आहे.'

या प्रकारचा त्रास वाढला

१) डोके दुखणे २) डोळे दुखणे ३) डोळ्यांची क्षमता कमी होणे ४) कमी दिसणे ५) डोळे कोरडे होणे

**चमकणारे दिवे ठरू शकतात घातक?**

शहरातील चौकांमध्ये; तसेच रस्त्यांवर प्रखर आणि चमकणारे



दिवे लावण्यात येत असल्याचे दिसून येते. त्यामुळेही डोळ्यांवर परिणाम होतो. चमकणारे लाइट अतिप्रमाणात डोळ्यांवर पडल्यामुळे डोळ्यांची क्षमता कमी होण्याची शक्यता असते. वाहन चालवताना अचनाक समोरून डोळ्यांवर प्रखर उजेडाचा झोत आल्यास दिसेनासे होते. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते.

**'व्हर्च्युअल ऑटिझम'ची लक्षणे**

सततच्या स्क्रिन टाइममुळे लहान वयातच 'ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर'ची लक्षणे दिसून येत आहेत.

अलिकडील झालेल्या वैद्यकीय अभ्यासानुसार, टीव्ही, व्हिडिओ गेम, आयपॅड किंवा कॉम्प्युटरसह स्क्रीनसमोर खूप वेळ घालवणाऱ्या अनेक लहान मुलांमध्ये ऑटिझमशी संबंधित लक्षणे आढळतात. जेव्हा पालक काही महिन्यांसाठी स्क्रीन टाइम कमी करतात तेव्हा ही लक्षणे दूर होतात. हा 'सिंड्रोम व्हर्च्युअल ऑटिझम' म्हणून ओळखला जातो.

गेल्या दोन वर्षांमध्ये १० ते ४५ या वयोगटात डोळ्यांचे आजार वाढल्याचे दिसून येते. पूर्वीच्या तुलनेत गेल्या दोन वर्षांमध्ये साधरणतः ३० ते ४० टक्क्यांनी दृष्टीदोषाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. यामध्ये शाळकरी आणि महाविद्यालयीन मुलांमध्ये दृष्टीदोषाचे प्रमाण जास्त आढळून येत आहे.

**- डॉ. संजय पाटील, नेत्ररोग तज्ज्ञ, चेअरमन, हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया.**

# उमेदवारी न मिळाल्याने शैलेश टिळकांची नाराजी

सुराज्य/पुणे

२० वर्षे बरोबरीने काम करणाऱ्या पुणे शहरातील ताईंच्या सहकाऱ्यांनी जाणीव ठेवायला पाहिजे होती, अशी भूमिका कसब्याची उमेदवारी न मिळाल्यानंतर मुक्ता टिळक यांचे पती शैलेश टिळक यांनी मांडली आहे. शैलेश यांनी सदर विधान करत पक्षातील नेत्यांबाबत उघडउघड नाराजी व्यक्त केली. कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मुक्ता टिळक आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. त्या निवडणुकीकरिता आज भाजपाकडून कसबा पेठ विधानसभा मतदारसंघासाठी हेमंत रासने, तर चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली.




# २८ हजार गावांमध्ये लवकरच 'बीएसएनएल'ची ४ जी' सेवा

सुराज्य/मुंबई

भारत संचार निगम लिमिटेडकडून (बीएसएनएल) येत्या वर्षभरात देशभरातील ग्राहकांना ४ जी, तर सुमारे अडीच वर्षांत ५ जी सेवा उपलब्ध होईल. सोबत देशातील एकही मोबाईल कंपनीचे नेटवर्क नसलेल्या २८ हजार गावांत बीएसएनएल' वर्षभरात ४ जी सेवा उपलब्ध करेल, अशी माहिती 'बीएसएनएल'चे (दिल्ली) संचालक (मानव संसाधन) अरविंद वडणेरकर यांनी दिली.

नागपुरातील झिरो माईल्स येथील कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत वडणेरकर म्हणाले की, 'देशातील काही आदिवासी पाडे, नक्षलग्रस्त, दुर्गम भागातील गावांसह काही मागास भागातील गावांमध्ये आजही एकही कंपनीचे मोबाईल नेटवर्क नाही. या गावातील नागरिकांना चांगल्या सेवा देण्यासाठी केंद्र सरकारच्या सूचनेवरून बीएलएनएल'ने काम सुरू केले आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील ४ हजार ९०० गावांसह देशातील २८ हजार गावांत 'बीएसएनएल'ची '४ जी' नेटवर्कची सेवा सुरू होईल.






# हिंडेनबर्ग



## धोका आणि धक्का



### हिटलरला हिंडेनबर्गने आणले सत्तेवर



सन १९३२ साली पुन्हा जर्मनीमध्ये निवडणुका लागल्या. त्यावेळी हिंडेनबर्ग ८४ वर्षांचे होते. त्यांनी राष्ट्राध्यपदाची निवडणूक लढवावी, असा आग्रह संपूर्ण जर्मनीमधून झाला. लोकइच्छेला मान देत हिंडेनबर्ग यांनी ही निवडणूक लढवली आणि जिंकलीसुध्दा. मात्र सरकार अस्थिर झाले. वय झाल्यामुळे शरीर साथ देत नव्हते. १९३३ ला नाझी पार्टीने बहुमताने आधीच्या चान्सलरला काढून टाकण्याचा ठराव सभागृहामध्ये मांडण्याचे ठरवले होते. त्यामुळे अशक्त आणि आजारी हिंडेनबर्गने हिटलरला ३० जानेवारी १९३० रोजी जर्मनीच्या चान्सलर पदाची शपथ दिली. तेथूनच ॲडॉल्फ हिटलर या हुकमशहाचा जन्म झाला.

### एक काळा विनोद

हिंडेनबर्गवर दबाव आणण्यासाठी हिटलरच्या नाझी पार्टीचे समर्थक मोठ्या प्रमाणावर संसदेच्या गेटवर जमले होते. हिटलरचा प्रचारप्रमुख गोबेल्स स्वत: समर्थकांच्या समुदायात हजर होता. संध्याकाळपर्यंत २० हजार लोकांचा समुदाय त्या ठिकाणी हिटलरला चान्सेलर बनवण्यात यावे या मागणीसाठी जमा झाला. होता. त्याच्या काही तास अगोदर वृद्ध हिंडेनबर्गने हिटलरला चान्सलर पदाची शपथ देऊन टाकली होती. हिटलरने त्यानंतर बाहेर येऊन स्वत:ची नियुक्ती झाल्याचे जाहीर केले आणि लोकांमध्ये जल्लोष सुरू झाला. या प्रसंगाला गोबेल्सने अत्यंत मोठ्या चमत्काराची रात्र असे नाव दिले. हुकूमशहा असलेल्या हिटलरची नियुक्ती मात्र संविधान संमत असलेल्या तरतुदीनुसार केली गेली होती हा इतिहासातील एक काळा विनोद आहे.

### हिंडेनबर्ग एअरशिपची निर्मिती

झेपलिन ही जर्मनीमधील एक मोठी विमान बनवणारी कंपनी. या कंपनीने हवेत उडणारे जहाज (एअरशिप) बनवले. त्या एअरशिपला जर्मनीचे माजी राष्ट्राध्यक्ष पॉल वॉन हिंडेनबर्ग यांचे नाव दिले. त्याची लांबी एकूण ८०४ फूट होती. या शिपसाठी हायड्रोजनचा वापर केलेला होता. अर्थातच हे शिप म्हणजे हायड्रोजन वायूचा फुगा होते. हायड्रोजन वायू वजनाने खूपच हलका असून तो हवेत तरंगतो. म्हणून हायड्रोजन वायू एका फुग्यात भरून त्यावर वजन लादून अल्पशा इंधनाचा वापर करून हा फुगा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येतो. हेच तत्त्व वापरून हिंडेनबर्ग हे एअरशिप बनवले होते. जगप्रसिध्द टायटॅनिक जहाजापेक्षा आकाराने थोडेसे लहान होते. यातला थोडा भाग प्रवाशांसाठी वापरला जात होता. उरलेल्या जागेत हायड्रोजन वायू साठवला जात होता. या हायड्रोजनमुळे हे एअरशिप उडत होते. वरच्या आणि मागच्या भागात हायड्रोजन आणि पुढे होड्यांच्या आकाराचे हौद होते. या हौदांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कामाची आणि प्रवाशांच्या बसण्याची, जेवणाची, झोपण्याची सोय होती.

### आकाशातील टायटॅनिक अर्थात हिंडेनबर्ग दुर्घटना

दि. ३ मे १९३७. जर्मनीचे एअरशिप हिंडेनबर्गने फ्रँकफर्टहून टेकऑफ केले. तीन दिवसांनंतर म्हणजे दि. ६ मे १९३७ रोजी ते अमेरिकेतल्या लेकहर्स्टल येथे लँड होणार होते. या एअरशिपमध्ये ३६ प्रवासी आणि ६१ कर्मचारी असे एकूण ९७ लोक होते. प्रत्यक्षात या एअरशिपमध्ये ७० सीट होत्या. मात्र या फेरीत फक्त ३६ प्रवाशांचेच बुकिंग झाले होते. लेकहर्स्ट फ्लाईंग स्टेशनवर मात्र ६० प्रवासी हिंडनबर्गची वाट पाहात होते. हे प्रवासी अमेरिकेहून युरोपला जाणार होते. जलमार्गाने अटलांटिक महासागर पार करायला किमान दोन महिने लागत होते. मात्र हिंडेनबर्ग हेच अंतर अवघ्या तीन दिवसांत पार करत होते. अटलांटिक पार करताना हिंडनबर्गला फारशी अडचण आली नाही. बोस्टनदरम्यान वादळ आडवे आल्यामुळे काहीसा उशीर झाला. लेकहर्स्ट ते संध्याकाळी पोचले. लेकहर्स्ट फ्लाईंग बेसवर गर्दी जमली होती. पत्रकार होते, बघे होते. तिथल्या लोकांनाही हिंडेनबर्ग पाहयचे होते. त्याकाळी एअरशिप पूर्णपणे जमिनीवर न उतरता फ्लाईंग बेसवर असलेल्या मोठ्या मोठ्या उंच खांबावर बांधण्याची पध्दत होती. हवेतून हळूहळू वेग कमी करत हिंडेनबर्ग अचूक जागा शोधण्याच्या नादात हवेतल्या हवेत तीनदा फिरले. पण शेवटी चौथ्यांदा ते योग्य ठिकाणी आले संध्याकाळचे साडेसात वाजले होते. लँडिंगची प्रक्रिया सुरू असतानाचा जमिनीवरच्या काही प्रत्यक्षदर्शींना वरच्या भागातून वायुगळती होताना दिसली. त्यानंतर पुढच्या काही क्षणातच हिंडेनबर्गने पेट घेतला. लाल-पिवळ्या रंगांच्या ज्वाळांचा लोट गगनाला भिडला. काय होत आहे हे कळण्याच्या आतच हिंडेनबर्गचा स्फोट झाला होता. एअरशिपमध्ये असलेल्या ९७ लोकांपैकी ३५ आणि जमिनीवरची एक व्यक्ती अशा ३६ लोकांची जीव गेला. अनेकांनी पेटत्या एअरशिपमधून उड्या टाकून आपला जीव वाचवला. पण जे वाचले तेही गंभीररीत्या भाजले होते. अवघ्या ३७ सेकंदात हिंडेनबर्गचा कोळसा झाला.



पॉल व्हॉन हिंडेनबर्ग. १९२५ साली जर्मनीचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले होते. प्रशियामध्ये जन्मलेले हिंडेनबर्ग वयाच्या १८ व्या वर्षी जर्मन सैन्यात भरती झाले होते. पहिले महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच हिंडेनबर्ग सैन्यदलातून निवृत्त झाले होते. पहिले महायुद्ध सुरू झाले. संपूर्ण जग त्यात ओढले गेले. तेव्हा आपली देशाला गरज असल्याचे ओळखून हिंडेनबर्ग पुन्हा सैन्य दलात दाखल झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली जर्मन सैन्याने १९१४ साली ताहीनबर्गच्या लढाईत रशियाचा पराभव केला. त्यामुळे साहजिकच हिंडेनबर्ग हे नाव जागतिक पातळीवर पोहचले. युध्द संपताच हिंडेनबर्ग यांनी पुन्हा सेवानिवृत्ती घेतली. त्यानंतर १९२५ साली झालेल्या निवडणुकीत हिंडेनबर्ग जर्मनीचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले.

## हिंडेनबर्गने अदानी कंपनीवर केलेले आरोप

**पहिला आरोप :** अदानी समूहाच्या कंपन्यांच्या शेअर्सची किंमत त्याच क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या इतर कंपन्यांच्या तुलनेत ८५ टक्के जास्त आहे. वास्तविक, शेअरची किंमत त्या कंपनीने केलेल्या नफ्यावरून ठरवली जाते. कंपनीच्या नफ्याच्या तुलनेत कंपनीच्या शेअरची किंमत किती असेल याचा अंदाज बाजार मांडतो. याला प्राईस अर्निंग रेशो म्हणतात.

**दुसरा आरोप :** अदानी समूहाने शेअर बाजारात हेराफेरी करून आपल्या समभागांची किंमत वाढवली आहे. अदानी यांनी मॉरिशस आणि इतर देशांतील कंपन्यांमध्ये पैसे गुंतवले. त्या कंपन्यांनी नंतर अदानी ग्रुपच्या कंपनीचे शेअर्स खरेदी केले. अशा प्रकारे परदेशी कंपनीने शेअर्स खरेदी केल्याने अदानी कंपनीवर लोकांचा विश्वास वाढतो. यामुळे शेअरची मागणी वाढते आणि मागणी वाढली की शेअरची किंमतही वाढते. अदानी यांचा भाऊ विनोद दुबईत बसून तो असेच काम करत असल्याचे हिंडेनबर्गच्या अहवालात म्हटले आहे. या अहवालात विनोद अदानी यांच्याशी संबंधित ३८ कंपन्यांचाही उल्लेख करण्यात आला आहे.





## काय सांगतो हिंडेनबर्ग रिपोर्ट?

▶ १. जगातला तिसरा श्रीमंत व्यक्ती जगातली सर्वात मोठी चोरी करत आहेत. अकाऊंटिंग फ्रॉड आहे. ▶ २. गेल्या ३ वर्षात उद्योगपती गौतम अदानींच्या संपत्तीत कमालीची वाढ ▶ ३. गेल्या ३ वर्षात गौतम अदानींना तब्बल १०० अब्ज डॉलरचा नफा झाला ▶ ४. ७ लिस्टेड कंपन्यांचे भाव तब्बल ८१९ टक्क्यांनी वाढले आहेत. ▶ ५. अदानी ग्रुपविरोधात तब्बल १० अरब डॉलरच्या सरकारी फसवणुकीचा तपास झाला आहे, ज्यात मनी लॉंड्रिंग, करचोरी आणि भ्रष्टाचाराची प्रकरणे आहेत. ▶ ६. अदानी ग्रुपवर प्रचंड कर्ज आहे आणि अनेक शेअर्स त्यांनी गहाण ठेवले आहेत. पहिले अदानींचे शेअर्स २ ते ३ वर्षात ३ हजार टक्क्यांनी वाढले आणि नंतर जेव्हा हेच शेअर्स गगनाला भिडले तेव्हा त्याच शेअर्सवर अदानी ग्रुपने कर्जे घेतली. ▶ ७. अदानींच्या कंपनीतील वरिष्ठ पातळीवरच्या अधिकाऱ्यांमध्ये २२ पैकी ८ जण तर अदानी कुटुंबातलेच आहेत. ग्रुपच्या आर्थिक आणि महत्त्वाच्या निर्णयांमध्ये त्यामुळे अदानी कुटुंबीयांचाच कंट्रोल असतो.

**अदानी ग्रुपचे स्पष्टीकरण :** हिंडेनबर्गचा रिपोर्ट दिशाभूल करणारा असून त्यांच्यावर आम्ही कायदेशीर कारवाई करणार आहोत. अदानी ग्रुपची प्रतिमा खराब करण्यासाठी कोणत्याही संशोधनाशिवाय हा रिपोर्ट तयार करण्यात आलेला आहे. रिपोर्टमुळे कंपनीच्या शेअर्स आणि गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो.शेअर बाजारातील घसरणीमुळे चिंता व्यक्त केली जात आहे. अदानी एंटरप्रायझेस च्या FPO ला नुकसान पोहोचवण्यासाठी हा प्रयत्न असल्याचा दावा अदानी ग्रुपकडून करण्यात आला आहे

### हिंडेनबर्ग संशोधन संस्थेची स्थापना

हिंडेनबर्ग एअरशिपच्या अपघातानंतर ९० वर्षांनी नेथन ॲन्डरसन नावाच्या व्यक्तीने हिंडेनबर्ग रिसर्च नावाची संशोधन संस्था उभी केली. ॲन्डरसनने स्थापन केलेल्या हिंडेनबर्ग संस्थेच्या मते, हिंडेनबर्ग दुर्घटना म्हणजे पूर्णपणे मानवनिर्मित, पूर्णपणे टाळता येण्याजोग्या आपत्तीचे प्रतीक. ब्रह्मांडातील सर्वात ज्वलनशील वायूने भरलेल्या फुग्यात जवळपास १०० लोकांना बसवले होते. त्यापूर्वी जवळपास डझनभर हायड्रोजन-आधारित विमानांचा अपघात झालेला होता. हे माहिती असतानाही पण हिंडेनबर्गच्या मालकांनी एअरशिपद्वारे विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. हा धोका पत्करला. त्यातून ३७ लोकांचा जीव गेला. अशाच प्रकारचा धोका पत्करून दुसऱ्यांना धोका निर्माण करणाऱ्याचा लोकांचा पर्दाफाश करण्यासाठी नेथन ॲन्डरसनने त्याच्या रिसर्च इन्स्टिट्यूटला ‘हिंडेनबर्ग’ हे नाव दिले.

### कोण हा नेथन ॲन्डरसन?



नेथन ॲन्डरसन हा व्यवसायाने सी.ए.( सनदी लेखापाल) आहे. तो संपत्ती व्यवस्थापनात अनेक श्रीमंत लोकांना सल्ला देण्याचे काम करतो. संपत्ती वाढण्यासाठी गुंतवणुकीचा सल्ला देणे हे त्याचे काम आहे. त्यांचे ग्राहक जास्त करून श्रीमंत व्यावसायिक आहेत. एखाद्या कंपनीचे शेअर्स कधी विकावेत, कधी खरेदी करावेत इत्यादी बाबीतही सल्ला देण्याचे काम तो करतो.

### हिंडेनबर्ग रिसर्चचे काम

४१. आर्थिक अहवाल जाहीर करणे

हिंडेनबर्ग संस्था आर्थिक क्षेत्रात काम करते. संस्थेने आतापर्यंत अनेक कंपन्यांचा आर्थिक अहवाल सादर केला आहे. काही दिवसांपूर्वीच डिंडेनबर्गने भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती गौतम अदानीच्या अदानी समूहाचा आर्थिक अहवाल सादर केला. अदानी समूहाने भ्रष्ट मार्गाने शेल कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून, संपत्ती कमावल्याचा दावा करण्यात आला आहे. या अहवालानंतर अदानी समूह आर्थिक अडचणीत आला असून दररोज त्यांच्या नुकसानीचा आकडा वाढत चालला आहे.

४२. ॲक्टिव्हिस्ट शॉर्ट सेलिंग


हिंडेनबर्ग संस्था शेअर मार्केटमध्ये ॲक्टिव्हिस्ट शॉर्ट सेलिंगचे कामही करते. एखाद्या कंपनीतील शेअरचा वापर कंपनीच्या व्यवस्थापनावर दबाव आणण्यासाठी करणाऱ्या शेअरहोल्डर्सना अक्टिव्हिस्ट शेअरहोल्डर म्हणतात.

४३. शॉर्ट सेलिंग

एखादा शेअर अगोदर जास्त किंमतीत विक्री करायचा आणि शेअरची किंमत कमी झाली की तो पुन्हा खरेदी करायचा. समजा तुमच्याकडे एखाद्या कंपनीचे १० शेअर्स आहेत, त्यांची किंमत ५०० रुपये आहे. तुम्हाला माहिती मिळाली की त्यांची किंमत कमी होणार आहे, म्हणून तुम्ही ते शेअर्स विकता. बातमी खरी ठरते आणि त्या शेअर्सची किंमत ४५० रुपये होते. मग तुम्ही ते शेअर्स परत विकत घेता. म्हणजे तुमच्याकडे १० शेअर्स परत आले आणि एका शेअरमागे ५० रुपये नफासुद्धा मिळाला. हिंडेनबर्ग संस्था अशी ॲक्टिव्हिस्ट शॉर्ट सेलिंग करणारी संस्था आहे.

### हिंडेनबर्गचे काम कसे चालते?

एखादी कंपनी शेअरमार्केटमध्ये आर्थिक गडबड करत आहे, अशी शंका येते, तेव्हा हिंडेनबर्ग अशा कंपनीचे संशोधन करायला सुरुवात करते. त्यासाठी काही महिने लागतात. या कालावधीत हिंडेनबर्ग संबंधित कंपनीचा तपास अहवाल, तिच्या सार्वजनिक नोंदी आणि अंतर्गत कॉर्पोरेट दस्तऐवज प्राप्त करून घेते. संबंधित कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांशी बोलून माहिती मिळवली जाते. त्यासाठी कंपनीतील निवृत्त अधिकाऱ्यांशीसुध्दा चर्चा करून सर्व प्रकारचे सबळ पुरावे गोळा केले जातात. ▶ अहवाल प्रसिध्दीपूर्वी : संपूर्ण संशोधन करून तयार केलेला अहवाल हिंडेनबर्ग सर्वात पहिल्यांदा संबंधित कंपनीच्या गुंतवणूकदारांना देते. परिणामी गुंतवणूकदारांना शॉर्ट सेलिंग करण्याची संधी मिळते. अहवाल सार्वजनिक केल्यानंतर शेअर्सची विक्री केली जाते आणि किंमत कमी झाल्यावर पुन्हा विकत घेतले जातात. त्यामुळे गुंतवणूकदारांचा कंपनीतील सहभाग तितकाच राहून त्याला वेगळा नफा मिळतो. हिंडेनबर्गने अदानी समूहाबद्दल सादर केलेल्या अहवालामुळे समूहाच्या शेअर्सची किंमत कमी झाली आहे. त्यामुळे ज्यांच्याकडे या समूहाचे शेअर्स आधीच होते ते त्यांचे शेअर्स विकून पुन्हा स्वस्तात घेऊ शकतात. त्यातून हिंडेनबर्गच्या गुंतवणूकदारांचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. ▶ हिंडेनबर्गने केला यापूर्वी १६ कंपन्यांचा रिसर्च : अदानी समूहाच्या नकारात्मक अहवालापूर्वीही हिंडेनबर्गने अनेक कंपन्यांविरुद्ध अहवाल जारी केले आहेत. २०२० मध्ये सुमारे १६ अहवाल प्रसिद्ध करण्यात आले. या अहवालांमुळे कंपन्यांचे शेअर्स सरासरी १५ टक्क्यांनी घसरले. Hindenburg Zo Nikola, SCWORX, Genius Brand, Ideanomic, Vince Finance, Genius Brands, SC Wrox, HF Food, Bloom Energy, phria, Twitter Inc या कंपन्यांविरुद्ध अहवाल दाखल केला आहे.



### कोण आहेत हे सदस्य?

▶ १. अदानी ग्रुपचे मॅनेजिंग डिरेक्टर राजेश अदानी हे गौतम अदानींचे भाऊ आहेत. ज्यांना फॉर्जरी आणि टॅक्स चोरीप्रकरणी दोनवेळा अटक झालेली. ▶ २. समीर वोहरा, गौतम अदानींचे मेहुणे डायमंड ट्रेडिंग स्कॅममध्ये आरोपी होते. १९९४ पासून अदानी ग्रुपसोबत असून ते रेल प्रोजेक्ट, पोर्ट प्रोजेक्ट पाहतात. ▶ ३. विनोद अदानींवर काळपवशपलींस चा आरोप आहे की, गौतम अदानी यांचे भाऊ विनोद अदानी शेअरच्या किंमती वाढवण्याचं काम करतात. ते मॉरिशिअसचे फंडस् आणि शेल कंपन्यांमार्फत अदानींच्या शेअर्समध्ये पैसे लावत आहेत. ▶ विनोद अदानींमार्फत चालवल्या जाणाऱ्या ३८ शेल कंपन्यांचा उल्लेखही रिपोर्टमध्ये आहे. या कंपन्या सायप्रस, णए, सिंगापूरसारख्या ठिकाणी आहेत. रिपोर्टमध्ये सांगितलंय की, या कंपन्यांच्या कामाचा कुठेच काही रेकॉर्ड नाहीये, ना पत्ता ना कोणते कर्मचारी. असं असूनही बिलियन डॉलर्स अदानींच्या पब्लिकली लिस्टेड आणि प्रायव्हेट एंटिटीजमध्ये जमा करण्यात आले आहेत.